

*Anand Charitable Sanstha, Ashti's*

# Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya,

**(Arts, Commerce and Science)**

*Kada, Tal. Ashti. Dist. Beed 414 202 (Maharashtra)*

# Criteria VII

## 7.3.1 INSTITUTIONAL DISTINCTIVENESS

**Phone**
+02441-2396210
+91 9421404246

**Contact**
admkada@gmail.com
www.admkada.com

**Address**
Anandrao Dhonde Alias Babaji
Mahavidyalaya Kada, Taq-Ashti,
District-Beed 414 202 (M.S.)

Made with PosterMyWall.com

सत्यमेव जयते

# ग्रामपंचायत कार्यालय, सराटेवडगाव / आनंदवाडी

## ता. आष्टी जि. बीड

सरपंच : प्रा. डॉ. राम बोडखे | ग्रामसेवक : सायंबर जी. डी | उपसरपंच : अयोध्या महादेव शिंदे

मो : ९४२३०३२२२२ | मो : ९८९०७५८००२ | मो ७५०७३९९९९९

अभिनंदन / आभार पत्र

दिनांक 15.8.19

ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगाव / आनंदवाडी ता. आष्टी, जि. बीड.

प्रति,
मा. प्राचार्य साहेब,
आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय
कडा. ता. आष्टी जि. बीड.

महोदय,

उपरोक्त विषयी अभिनंदन पर पत्र लिहितो की, आपल्या महाविद्यालयाने आमचे गाव सराटेवडगाव / आनंदवाडी ता. आष्टी जि. बीड हे गाव पाच (५) वर्षासाठी रा. से. योजनेने दत्तक घेतले आहे

पाणी फाउंडेशन स्पर्धा-2018 मध्ये आनंदवाडी गावाने भाग घेतला आनंदवाडी हे गाव पाणी फाउंडेशन स्पर्धेत महाराष्ट्रात तृतीय क्रमांक मिळविला आहे. या स्पर्धेच्या काळात आपल्या महाविद्यालयाचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे म्हणून आपल्या योगदानाबद्दल अभिनंदन व आभार

सरपंच
ग्रा.पं. सराटे वडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी, जि. बीड

ग्रामसेवक
ग्रा.प. सराटे वडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी, जि. बीड

।।सत्यमेव जयते ।।

# आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता. आष्टी, जि. बीड



# ''राष्ट्रीय सेवा योजना दत्तक गाव सराटेवडगाव / आनंदवाडी गावाचा विकास एक इतिहास''


## मार्गदर्शक

## प्रा.डॉ. एच.जी.विधाते

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा,
ता. आष्टी, जि. बीड

## संशोधक

## डॉ. रामकृष्ण गहीनीनाथ बोडखे

(इतिहास विभाग प्रमुख)
आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा,
ता. आष्टी, जि. बीड
(सरपंच सराटेवडगाव /आनंदवाडी, ता. आष्टी, जि. बीड)


**मार्च-2017-22**

# प्रस्तावना

सराटेवडगाव / आनंदवाडी हे गाव निजाम राजवटी पासुन स्थापन झालेले आहे, निजाम राजवटीत या गावाचा सराटी वडगाव म्हणून उल्लेख आहे. या गावाचे आजचे क्षेत्रफळ 924 असून येथील लोकसंख्या 2300 आहे. तसेच या गावाला मेहकरी नदी असून या नदीकाठी हे गाव वसलेले आहे. तसेच या गावाला उत्तर-दक्षिण बाजुने डोंगर असुन गावाला बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. गावात विविध जाती-धर्माचे लोक राहतात.

गावात हिंदु-मूस्लीम-बौध्द या धर्माची लोक असून ते खूप वर्षापासुन एकत्र राहतात. येथे कधीच जातीय दंगल झालेली नाही. तसेच गावात हनुमान मंदीर, महादेव मंदीर यांच्या भिंतीलाच लागून मस्जिद आहे. त्याच्याच जवळ बौध्द विहार असून हे सर्व लोक जानपीर देवस्थानची यात्रा कित्येक वर्षापासून करत आहेत तसेच गावात सप्ताहाचेही कार्यक्रम प्रत्येक वर्षी घेतले जातात.

सराटेवडगाव / आनंदवाडी गावात बोडखे, तरटे, शिंदे सुंबरे, नन्नवरे, मिसाळ, कळसाईत, झांबरे, झडाडे, गजघाट, गायकवाड, थोरात, भूजबळ, काळे, वाघुले, साबळे, पठाण, शेख सय्यद, तिरमाली, (फुलमाळी), पारधी (भोसले), कुलकर्णी इ. समाजाचे लोक खूप वर्षापासून एकत्र राहतात. गावात सर्वच लोकांनी एकत्र येऊन अनेक समाजउपयोगी कामे केली आहेत.

गावच्या ग्रामपंचायतीची स्थापना 1962 पासून झालेली आहे. तसेच गावात सेवा सहकारी सोसायटी असून येथे दोन दूध डेअरी चालतात, जवळजवळ 2000 ली. दूध आहे.

गावामध्ये ज्या काही सुधारणा झाल्या त्यामध्ये आनंदराव धोंडे कॉलेजचा महत्वाचा सहभाग आहे. त्यामुळे अनेक पूरस्कार मिळवून या गावाचे नाव देशपातळीवर

गेले आहे. या गावातील बदलासाठी खऱ्या अर्थाने आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या NSS विभागचा सिंहाचा वाटा आहे. कारण या महाविद्यालयाने जर NSS चे शिबीर यागावात घेतले नसते तर हे गाव आज देशपातळीवर गेलेच नसते.

राष्ट्रीय सेवा योजनेने या गावात सन 2000 पासुन वेगवेगळ्या स्वरुपाची विविध शिबीरे घेतली उदा.विशेष शिबीर (हिवाळी शिबीर) जिल्हा स्तरावरील शिबीर तसेच राज्य स्तरावरील (हागणदारी मुक्त गाव) या थिमवर शिबीर घेऊन आनंदवाडी हे मराठवाड्यातील पहिले हागणदारी मुक्त गाव झाले हे केवळ राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरामुळे होऊ शकले आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिवीगरातून ग्रामविकासाचे विविध स्वरुपाचे विषय घेऊन गावात लोक चळवळी केल्या उदा. जलसंधारण, वृक्षारोपन, अंधश्रध्दा निर्मुलन इ. स्वरुपाच्या विषयावर लोक प्रबोधन केले. सराटेवटगाव/ आनंदवाडी हे गाव महाविद्यालयाने दत्तक घेऊन जो बदल केला त्यामुळे गावाचा विकास झाला आहे.

NSS च्या चळवळीचा पुढे फायदा होऊन याच महाविद्यालयाचे प्रा.डॉ. रामकृष्ण गहिनाथ बोडखे हे या गावचे दोन वेळा सरपंच झाले. त्यांच्या काळात विद्यापीठ स्थरावरील उत्कृष्ट महाविद्यालय व उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी एन.एस.एस.चे पुरस्कार मिळाले. तसेच महाराष्ट्र शासनाचाही उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला. एन.एस.एस. मधुन जल संधारणावरती खुप कामे केली. गावात जलसंधारणाची चळवळ होऊन गॅबीयन बंधारे, वनराई बंधारे, सि.सी.टी. इत्यादी स्वरुपाची कामे एन.एस.एस. म्हणुन करण्यात आले. याच चळवळीचा गावाला फायदा होऊन गावाने पाणी फौंडेशन, आय.सी.आय.सी. फौंडेशन, बी.जी.एस., मानवलोक, ज्ञानप्रबोधीणी, नाम फौंडेशन, इत्यादीमुळे अनेक गावात पाणलोटावरील कामे करून गावाने अनेक पुरस्कार मिळविले.

**उदा.**

1) निर्मल ग्राम पुरस्कार, ( 1 लक्ष)

2) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान बीड जिल्हा प्रथम पुरस्कार ( 5 लक्ष)

3) पर्यावरण ग्रामसमृध्द पुरस्कार ( 9 लक्ष)

4) आनंदवाडी गावाला पाणी फौंडेशनचा राज्यस्थरीय तृतीय पुरस्कार ( 25 लक्ष)

5) सरटेवडागवला पाणी फौंडेशनचा तालुक्यात प्रथम पुरस्कार (10 लक्ष)

6) आर.आर.आबा स्मार्ट ग्राम पुरस्कार तालुका प्रथम (दहा लक्ष)

7) केंद्र सरकारकडून जलसमृध्द गाव केल्यामुळे केंद्रीय कार्यशाळेत सन्मान.

अशा विविध स्वरुपाचे पुरस्कार गावाला मिळण्यासाठी आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा सिंहाचा वाटा आहे. आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.जी. विधाते यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य होते. महाविद्यालयातील प्रा. डॉ.गोपीनाथ बोडखे, प्रा.डॉ. दत्तात्रय बोडखे, प्रा. ईश्वर नन्नवरे, शेख फिरोज तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्येपकेतर कर्मचारी यांनी गाव बदलण्यासाठी खूप सहकार्य केले. त्यामुळेच एन.एस.एस. मुळे सराटेवडगाव / आनंदवाडी गाव बदलू शकले.

सराटेवडगाव / आनंदवाडी हे गाव ग्रामस्थ, युवक व महिला या सर्वांच्या सहकार्यामुळे गावात बदल झाला. परंतु हा बदल होण्यासाठी आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्यामुळे विशेष शिबीरामुळे गावात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. गावात राज्यस्थरीय विभाग स्थरीय, जिल्हा स्थरीय, तालुका स्थरीय अनेक स्वरुपाचे शिबीरे एन.एस.एस.चे घेण्यात आले. त्यामुळेच सराटेवडगाव / आनंदवाडी गावाचा कायापालट होऊ शकला.

***

# प्रकरण पहिले

## प्रस्तावना आणि सामाजिक संशोधन पध्दती

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना आणि सामाजिक संशोधन पध्दती

भारत देशात खेडी हा महत्वाचा घटक आहे. खेडी सुधारली तर देश सुधारेल याच उद्देशाने भारतात आदर्श गाव म्हणून राळेगणसिध्दीचा विकास 30 वर्षापूर्वी मा. अण्णा हजारेंनी केला आणि तोच प्रयत्न त्यानंतर मा. पोपट पवार यांनी हिवरे बाजार येथे केला. महाराष्ट्र शासनाने आदर्श गाव करण्यासाठी स्वच्छता अभियान स्पर्धा सुरू केली आणि त्यानंतर खेडी आदर्श होण्यास सुरूवात झाली.

असेच आदर्श गाव करण्यासाठी आनंदवाडी ग्रामस्थांनी राम बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरूवात झाली. त्यांचा इतिहास आपण या लघू शोध प्रकल्पात घेत आहोत.

**आदर्श गावाचा अभ्यास :-**

राळेगण सिध्दी ज्यांनी निर्माण केली ते मा. अण्णा हजारे हे त्याचे निर्माते होते. येथून पुढेच आदर्श गाव करण्याची महाराष्ट्रात, देशात स्पर्धा निर्माण झाली. यामधुनच आनंदवाडी ग्रामस्थांनी आपले गाव आदर्श करण्यास सुरूवात केली. सन 1999 ते 2019 पर्यंतचा आदर्श गावाचा इतिहास या लघुशोध प्रकल्पात घेतला आहे. कारण आज महाराष्ट्रातील व देशातील गावे ही आदर्श होण्या ऐवजी ते राजकारणाची अड्डे झाली आहेत. गावा गावात अंतर्गत राजकारण भांडणे यामुळे गावाचा विकास होत नाही. गावामध्ये विकास कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो, गावामध्ये श्रमदानाचे महत्व नाही. ग्राम सुधारणे म्हणजे ते सरकारचे काम आहे अशी मानसिकता गावकऱ्यांची आहे. त्यामुळे गावाचा विकास होत नाही. हीच मानसिकता बदलण्याचे काम सर्वप्रथम महात्मा गांधी, गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, मा. अण्णा हजारे, मा. पोपट पवार व पेरे पाटील यांनी केले यामधून बरेच गावे आदर्श होऊ लागले.

**संशोधन विषयाची निवड :-**

लघू शोध प्रकल्प निवडायचा म्हंटले की, सर्वात महत्वाचा प्रश्न पडतो तो कशा प्रकारे निवडायचा ? या मधूनच आनंदवाडी हे गाव मराठवाड्यातील पहिले हगणदारी मुक्त तसेच अनेक ग्राम सुधारणेची कामे या गावाने केली. पाणी फांडेशनमध्ये या गावाने राज्यात तिसरा क्रमांक मिळविला. तसेच हे व्यसनमुक्त गाव आहे. आनंदवाडी हे आदर्श गाव राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटमुळे झालेले आहे. त्यामुळेच या विषयाची निवड केली आहे.

**संशोधन विषयाची उद्दीष्टे :-**

लघू शोध प्रकल्प विषयाची उद्दीष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे.

1) आनंदवाडीचा पूर्व इतिहास अभ्यास केलेला आहे.

2) आनंदवाडी गावाच्या ग्रामविकासाचा अभ्यास करण्यात आला.

3) आनंदवाडी गावात राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य शिबीर घेण्यात आले आहे.

4) आनंदवाडी गावाने पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविला आहे.

5) प्रा. सौ. हेमाली बोडखे सरपंच झाल्यावर गावाला मिळालेल्या चार पुरस्काराचा अभ्यास करण्यात आला आहे.

6) आनंदवाडी गावाला पाणी फांडेशनचा राज्याचा तृतीय पुरस्कार मिळालेला आहे, त्याचा अभ्यास केला आहे.

**संशोधन विषयाची गृहीतके :-**

प्रस्तुत संशोधन अभ्यास विषयात गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

1) आनंदवाडी गावाचा पूर्व इतिहास लिहिला आहे.

2) आनंदवाडी हे गाव हागणदारी मुक्त करून मराठवाड्यातील पहिले आदर्श गाव बनविले.

3) आनंदवाडी गावाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन गावाचा विकास केला.

4) आनंदवाडी गावाने मिळविलेल्या पुरस्कारांचा अभ्यास केलेला आहे.

6) आनंदवाडी गावाने व्यसन मुक्तीचा केलेला संकल्प याचीही माहिती घेतली आहे.

7) आष्टी तालुक्यातील एक आदर्श गाव म्हणून आनंदवाडी गावाकडे पाहिले जाते.

**संशोधन स्वरुप व्याप्ती व कालमर्यादा :-**

कोणत्याही लघु शोध प्रकल्पाचे स्वरुप स्पष्ट करणे अगत्याचे असते. तसेच त्याची व्याप्ती स्पष्ट करून कालमर्यादा ठरवावी लागते. प्रथम अभ्यास विषय समजून घेणे, नंतर त्याचे स्वरुप निश्चित करून व्याप्तीची मांडणी करावी लागते. संशोधनाची काल मर्यादा ठरवितांना इ.स. 1999 ते 2019 पर्यंतची माहिती घेतलेली आहे.

**आनंदवाडीच्या अभ्यासाचे महत्व :-**

आनंदवाडी गावाने आदर्श गाव कसे असावे हे प्रथम मराठवाड्यात सांगण्याचा प्रयत्न केला. या गावाने हागणदारी मुक्त गाव या संकल्पनेवर राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य शिबीर घेतले. पाणी पुरवठ्याची आदर्श योजना राबविली. गावाने व्यसनमुक्तीचा संकल्प केला. तसेच सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धेत महाराष्ट्रात राज्यात तिसरा क्रमांक मिळवून गावाने 25 लक्ष रुपयाचे बक्षीस मिळविले. असे एक नव्हे अनेक विकासाची कामे गावाने केली. त्यामुळे या गावाचे महत्व मोठे आहे. म्हणुन अभ्यासाला "आदर्श गाव आनंदवाडीचा ग्राम विकासातील ऐतिहासिक लढा : एक अभ्यास" हा विषय घेतला आहे.

# प्रकरण दुसरे

## आनंदवाडीचा पूर्वइतिहास

# प्रकरण दुसरे
# आनंदवाडीचा पूर्वइतिहास

सराटेवडगाव हे मेहकरी नदीच्या काठावर वसलेले गाव. ती नदी अहमदनगरच्या चांदबीबी महालापासुन उगम पावते, मेहकरी, केळ, पिंपळगाव, देऊळगाव, भातोडी, दौलावडगाव, चिंचोडी पाटील, वाघळूज नांदूर, सोलापूरवाडी, खूंटेफळ पूंडी, दाणी पिंपळगाव मार्गे सराटेवडगावला येते.

सराटेवडगाव हे सरासरी 1800 लोकसंख्या असलेले आष्टी तालुक्यातील एक खेडेगाव आहे. या सराटेवडगावचे 7/12 चे दोन गट आहेत. 1 ते 55 व 56 ते 108 पैकी 56 ते 108 सर्वेनंबरमधील शेतकऱ्यांची सर्व जमीन नदीच्या पश्चिमेला आहे. अतिवृष्टीमूळे नदीला मोठा पूर येत असे नदी पात्रात पाण्याची पातळी सरासरी 8 ते 10 फुटापर्यंत असायची आणि 15 ते 20 दिवस अलीकडे-पलीकडे जाता येत नसे आणि शेतीची काम बंद पडत असे.

त्यामुळे 56 ते 108 सर्वेनंबरमधील शेतकरी आपल्या शेतातच वस्ती करुन राहु लागले. हळुहळु घरे बांधुन लोकवस्ती झाली. 1959 ला मेहकरी नदीवर मोठे मेहकरी धरणाचे काम सुरु झाले. तो तलाव 1964 ला पूर्णत्वास आला. आणि 1964 ला कॅनॉलमधून शेतीसाठी पाणी सोडण्यात आले. आणि सर्व जमिन ओलिताखाली आली. आणि लोकांचा कायापालट झाला.

सन 1968, 69 व 70 या तीन वर्षामध्ये बिनापगारी शाळा गावामध्ये श्री रोहीदास गुरुजी यांनी चालविली 1970 नंतर त्याच शाळेचे रुपांतर जि.प.शाळेत झाले. अशा प्रकारे गावात शाळा सुरु झाली.

1964 ला मारुती मंदीर उभारण्यात आले. आता वाडीत धार्मिक, सामाजिक आणि लग्नाचे कार्यक्रम होऊ लागले. 1972 ला मोठा दुष्काळ पडला परंतु मेहकरी धरणातून शेतीला पाणी मिळाल्यामुळे दूष्काळाची झळ बसली नाही. दरवर्षी शेतीला पाणी मिळू लागले व चांगले उत्पन्न मिळू लागले.

इ.स.1975 मध्ये वृध्देश्वर निवासी ह.भ.प. रघूनाथ महाराज ऊंबरेकर वाडीमध्ये आले. किर्तन झाले. किर्तनाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून दिले त्याचा परिणाम एवढा झाला की. 1975 च्या जून महीन्यात स्त्री-पुरुष यांची रात्रीची शाळा सुरु केली स्त्रीयांसाठी रात्री प्रौढवर्ग सुरु झाले. 14 ते 35 वयोगटातील सर्व साक्षर झाले. ह.भ.प. रघूनाथ महाराज ऊंबरेकर पून्हा किर्तनासाठी आले आणि त्यांनी आनंदाची गोष्ट सांगितली की यावर्षीचा नारळी सप्ताहाचा नारळ नगरकरांनी घेतला होता. आणि तो रद्द झाला होता. आणि तो सप्ताह इथे या वाडीतच करा असे सर्व जाती धर्माच्या लोकंसमोर आव्हान दिले आणि सर्व लोकांनी त्यांना होकार दिला ठरल्याप्रमाणे सप्ताहाची सर्व पूर्वतयारी केली व सप्ताह मोठ्या आनंदात आणि उत्साहात पार पडला. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी ह.भ.प.रघूनाथ महाराज यांचे काल्याचे किर्तन चालू होते. त्यांनी किर्तनात असा उल्लेख केल की छोट्या वस्तीवर एवढा मोठा सप्ताह मोठ्या आनंदाने पार पाडला तर या वस्तीचे नाव आनंदवाडी का ठेवू नये. आजपासून या वस्तीला आनंदवाडी हे नाव दिले.

अशा प्रकारे आनंदवाडी हे नाव दिले गेले. या वाडीमध्ये बोडखे, झांबरे, सुंबरे, झगडे, काळे, कापरे, गायकवाड, वाघूले, नन्नवरे, विधाते, आणि मुस्लीम समाज आहे. हे सर्व लोक पूर्वी सराटेवडगावचे रहिवासी आहेत. अशी आनंदवाडी मोठ्या गुण्यागोविंदाने नांदत आहे. गाव ही आपल आपण सारे मिळून सुंदर करायच आपण सारे मिळून गावाचा विकास करायचा. या हेतूने सर्व ग्रामस्थ गाव विकासासाठी सुरवात केली, सर्व प्रथम गावांनी आनंदवाडी गाव हागणदारी मुक्त केले.

**आनंदवाडी मराठवाड्यातील पहीले हागणदारी मूक्त गाव**

आनंदवाडी गावाला अध्यात्मिक वसा असल्यामूळे गावांनी ठरवलेले काम आनंदवाडी गावातील लोक मनापासून करत असे. या काळात महाराष्ट्रात राळेगण सिध्दी हे गाव महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात एक आदर्श गाव म्हणून नावाजलेले होते. 1995 साली आनंदवाडी गावातील काही ग्रामस्थ राळेगण सिध्दी पाहण्यासाठी गेले त्यावेळेपासून आमचे आनंदवाडी गाव सुध्दा राळेगणसिध्दी सारखे व्हावे असे आम्हा सर्वांना वाटत होते.

गावामध्ये मूलांनी शासनाच्या एका स्कीममूधन टि.व्ही. आणला होता. तसेच गावात प्रा.राम बोडखे हे लहान मूलांना एकत्र करुण ओढ्यावर वनराई बंधारे बांधत असायचे. लोकसभेची निवडणूक होती. त्याच्या प्रचारासाठी एक जीप गावाला मिळाली होती. ग्रामस्थांनी हिवरेबाजारला जावयाचे ठरवले तेथे मोहन चत्तारने हागणदारीमूक्त गाव करा असे आम्हा ग्रामस्थांना सांगितले.

आनंदवाडी गावात एन.एस.एस. चे पहीले शिबिर 2004 ला घेण्यात आले या शिबिरात श्रमदान व लोकांना समाज प्रबोधनाचे व्याख्याने झाल्यामूळे लोकजागृती मोठ्या प्रमाणात झाली गाव हागणदारीमूक्त करण्याचा संकल्प प्रा.हेमाली बोडखे यांच्या मनात आला. त्यामूळे आमच्या गावातील एक टेम्पो महिला व एक टेम्पो पुरुष मूले मिळून राळेगण सिध्दी-हिवरेबाजार मळगंगादेवी ला जाऊन आले ते सर्व पाहिल्यावर गावाच्या विकासाचा विचार महीला-पुरुषांच्या मनात आला नंतर काही दिवसांनी दूसरी सहल वडगाव आमली व दातीर साहेबांचे गाव येथे गेलोत. याठिकाणी महीलांनी आनंदवाडी गाव व्यसनमूक्त करण्याचा संकल्प केला. त्यानंतर गावात आल्यानंतर ग्रामसभा झाली व या ग्रामसभेत शेख जाफरभाई व संजय बोडखे या दोन्ही दूकानदारांनी गावात व्यसनाचे पदार्थ ठेवायचे नाहीत असे ठरले. त्यानूसार गाव चार वर्षे व्यसनमूक्त झाले.

वडगाव आमली येथे प्रा.गोपीनाथ बोडखे सरानी टिव्हीवरील वृत्तवाहीनीला मूलाखत दिली. आनंदवाडी हे गाव एक महीन्यात हागणदारीमूक्त करु त्यानुसार गावकऱ्यांनी काम करण्याचे ठरवले गावात आनंदराव धोंडे कॉलेजचा एन.एस.एस. कॅम्प आला. तेव्हा कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.राम बोडखे व प्रा.संभाजी ओव्हळ हे होते यांनी या 10 दिवसीय शिबिरात एन.एस.एस. मूलांकडून हागणदारीमुक्ती साठी खड्डे खोदून घेतले या शिबीरामूळे गावकऱ्यांची मन जुळली थोडक्यात गावकऱ्यांचे मन संधारण झाले त्याचाच फायदा गावासाठी मोठ्या प्रमाणात झाला. शिबिर झाल्यावर उरलेले खड्डे गावातील मूलांनी रात्री खोदली. रात्री 9 ते 12 वाजेपर्यंत मूले श्रमदान करुन गावातील खड्डे खोदत असत यानुसार गावात 40 खड्डे खोदण्यात आले खड्डे खोदण्याचे काम पूर्ण झाले.

आनंदवाडी गावात सर्वप्रथम शौचालय बांधण्याचा पूढाकार प्रा. हेमाली बोडखे यांनी घेतला यांनी सन 2002 ला शौचालय बांधले होते. त्यानंतर त्यांनी गावच हागणदारी मूक्त व्हावे म्हणून महीलांमध्ये लोकजागृती करण्यास सुरवात केली त्यानुसार ह्या चळवळीसाठी महीलांनी पुढाकार घेतला. तसेच काही महीलांना शौचालय नको होते. कारण ते जवळ बांधले तर त्याचा वास येतो ही समजूत होती. त्यामुळे महीला प्रा.हेमाली बोडखे यांच्या घरापासून जाताना शौचालयामुळे नाकाला हात लावून जात होत्या. त्यांना शौचालयाचे महत्व नव्हते त्यांच्याच पोटात शौचालय आहे हे माहीत असुनही बांधलेल्या शौचालयाजवळ आल्यावर नाक बांधून जात होते. हा महीलांमध्ये गैरसमज होता तो दूर करण्याचा प्रयत्न एन.एस.एस. मधून करण्यात आला सर्वप्रथम गावात हागणदारीवर मा.नितीन उदमले (बी.डी.ओ.पारनेर) यांनी व्याख्यान दिले शौचालयाचे महत्व लोकांना पटत होते.

गावातील शौचालयाचे खड्डे खोदून झाल्यावर ते बांधण्यासाठी वाळू, सिमेंट, विटा, तसेच गवंडी पाहीजे होते त्यानुसार कडा येथील प्रकाश जाधव व पिंपळगाव येथील जाधव मिस्तरीला शौचालय बांधण्यासाठी दिले, विट उधारीवर घेतली, पोखरणा व पटवांकडून सिमेंट, भांडी, टाईल्स घेण्यात आली, तसेच वाळू गावातच मिळत असे त्यानुसार गाव एक महीन्यात रात्रीचे शौचालय बांधकाम करुन हागणदारीमूक्त केले. अशा प्रकारे एक महीन्यात आनंदवाडी गाव हागणदारी मूक्त झाले. गावातील लोकांनी स्वतः पैसे घालून शौचालय बांधले होते पैसे नव्हते तर सौ.बबाताई परभू बोडखे यांनी कानातील खूटबाळ्या मोडून पैसे दिले या चळवळीत प्रा.राम बोडखे, श्री देविदास सुंबरे, श्री रघूनाथ बोडखे, प्रा.गोपीनाथ बोडखे, रमेश बोडखे, इ. व्यक्तींनी गाव हागणदारी मूक्ती साठी मोठ्या प्रमाणात कष्ट घेतले होते. काही लोकांनी शौचालय बांधकामाचे पैसे दिले नाही तर देविदास सुंबरे यांनी राग आल्यामूळे एक-दोन शौचालय पाडून टाकले त्यामूळे काही लोकांना राग आला. परंतु जे शौचालयाचे सामान आम्ही उधारीवर आणले होते त्याचे पैसे न दिल्यामुळे आम्हाला कड्यातील कर्डीले महाराज पटवा व पोखरणा यांनी तगादा लावला होता त्यामुळे देविदास कडून आजाणतेपणी हे कृत्य झाले. काम करत

असताना अशा चूकाही होत असतात परंतु त्या सोडून देऊन पूढे चालायचे असते. अशा प्रकारे आनंदवाडी हे गाव मराठवाड्यातील पहीले हागणदारीमूक्त गाव झाले. तेव्हा श्रीमती रंगुबाई लक्ष्मण बोडखे ह्या सरपंच होत्या. पत्रकार उत्तम बोडखे यांनी गावाची प्रसिध्दी मोठ्या प्रमाणात केली. गावाचे संपुर्ण मराठवाड्यामध्ये नाव झाले.

# प्रकरण तिसरे

## आनंदवाडी गावात एन.एस.एस.चे राज्य शिबीर

# प्रकरण तिसरे
# आनंदवाडी गावात एन.एस.एस.चे राज्य शिबीर

आनंदराव धोडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाने आनंदवाडी हे गाव दत्तक घेऊन गावातील लोकांचे मनसंधारणाचे तसेच श्रमदानातून गाव सुधारण्याचे मोठ्या प्रमाणात काम केले. गावातील युवक हे मोठ्या प्रमाणात कॉलेजला असल्यामूळे त्याचा फायदा गावाला झाला. याच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून प्रा.दत्तात्रय बोडखे, प्रा.राम बोडखे व प्रा.गोपीनाथ बोडखे हे होते. त्यामुळे याचाही फायदा गावाला झाला. याच काळात एन.एस.एस. चे कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा.राम बोडखे हे काम पहात होते त्यांनी आपल्याच गावात प्रथम सुधारणा करावी या हेतूने गाव दत्तक घेतले. तसेच त्यांना समाजसेवेची पहील्यापासून आवड असल्यामूळे गावात समाजसुधारणेची चळवळ आणली होती. त्यांच्या चळवळीला यूवक व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात साथ दिल्यामूळेच गावाचा विकास होत चालला होता.

एन.एस.एस. चे विभागीय शिबीर आनंदवाडी गावात घेण्यात आले होते या शिबिराची थीम 'स्वच्छता दूत' ही होती. या शिबिरात मराठवाड्यातील 100 विद्यार्थी पाच दिवस गावामध्ये होते शिबिरामूळे आनंदवाडी गावाचे नाव झाले. हे शिबिर झाल्यावर गावात राज्यस्तरीय शिबीर व्हावे असे प्रा.राम बोडखे यांच्या मनात होते परंतु हे शिबीर घेण्यासाठी कोणाची ओळख नव्हती. परंतु मनात विचार आला होता त्यानुसार महाराष्ट्राच्या एन.एस.एस.प्रमूख श्री निलोफर मॅडम बीडला आल्या होत्या त्यांची भेट घेऊन त्यांना राज्यस्तरीय शिबीराची मागणी करावयाची होती त्यानुसार निलोफर मॅडमची भेट घेण्यासाठी बीडला गेलो. परंतु बीडहून येताना नायगाव येथे मॅडमची गाडी पंक्चर झाली. त्यामुळे मॅडम प्रा.राम बोडखे सरांच्या गाडीत बसून कड्याकडे निघाल्या. मॅडमला विनंती केली मॅडम आमचे आनंदवाडी हे गाव एन.एस.एस. मूळे हागणदारी मूक्त झाले आहे. त्यामूळे तुम्ही गाव पाहण्यासाठी या. तुम्हाला नक्कीच आवडेल असे सांगितले. महाराष्ट्रात एन.एस.एस. मूळे एकही गाव हागणदारी मूक्त झाले नाही ते धोंडे

कॉलेजच्या सहकार्याने झाले होते. गाव पाहील्यानंतर त्यांनी गावातील सुधारणा पाहून राज्यस्तरीय शिबीर देण्यास तयार झाल्या. त्यानुसार गावाला 2005 मध्ये एन.एस.एस. चे राज्यस्तरीय शिबीर मंजूर झाले.

राज्यस्तरीय शिबीर एका छोट्याशा गावात होणार असल्यामूळे गावाला त्याची मोठी तयारी करावी लागणार होती. त्यानुसार आनंदवाडी गावातील सर्व ग्रामस्थांनी आपण हे शिबीर यशस्वी करु असे सांगितले या शिबीरासाठी महाराष्ट्रातून 200 विद्यार्थी येणार होते. त्यांच्या तारखा घेण्याची जबाबदारी प्राचार्य विधाते सरांनी प्रा.राम बोडखे यांच्यावर सोपवीली त्यानुसार मा.अण्णा हजारे, मा.पोपट पवार मल्लीनाथ कलशेट्‌टी (विभागीय आयूक्त) व नागनाथ कोतापल्ली या मान्यवरांना निमंत्रण दिले. यांतील सर्व मान्यवर राज्यस्तरीय शिबीरासाठी आले. फक्त मा.अण्णा हजारेंना काम असल्यामूळे ते येऊ शकले नाही.

एन.एस.एस. च्या राज्यस्तरीय शिबीरासाठी गावातील काही लोकांनी आपले घर मोकळे करुन दिले होते संपूर्ण गावाला गुलाबी कलर देण्यात आला होता. त्यामूळे गाव गुलाबी वाटत होते. गावात घरोघरी फुलांची झाडे प्रा.राम बोडखे यांनी दिली होती सर्वांच्या घरासमोर पारीजातक, रातराणी, जास्वंद, मोगरा, चांदणी, इ. स्वरुपाची झाडे लावलेली होती. गाव एकदम शोभून दिसत होते. तसेच मारुती मंदीरासमोरील भिंतीवर गाडगेबाबा, तुकडोजी महाराज व गावाचा व बचत गटाचा परिचय दिला होता. या चित्राखाली परसबाग करण्यात आली होती.

राज्यस्तरीय शिबीर हे ''हागणदारीमूक्त ग्राम'' या थीमवर असल्यामूळे गावात येणारे मूलांनी शौचालयाचाच वापर केला पाहीजेत त्यामूळे त्या वेळेस बीड जि.प.चे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा.हरीदास साहेब होते त्यांना प्रा.राम बोडखे यांनी आम्हाला एका सार्वजनिक शौचालयाचे यूनिट देण्याची विनंती केली. त्यानुसार हरिदास साहेबांनी हे यूनिट दिले. पाच शौचाालय बांधण्यासाठी 60,000रु. मंजूर केले. त्यानूसार हे मिळालेले यूनिट पाच दिवसात बांधून पूर्ण केले. कारण हे राज्यस्तरीय शिबीरातील

मूलांना / मुलींना वापरासाठी लागणार होते. दिवसरात्र करुन ते पूर्ण केले. हरिदास साहेबांचा गावावर चांगला विश्वास होता. त्यानुसार त्यांचे खूप सहकार्य मिळत असे.

राज्यस्तरीय शिबीरासाठी संपूर्ण आनंदवाडीकरांनी खूप सहकार्य केले तसेच या शिबीरात जे श्रमदानाचे काम केले ते झांबरे यांच्या डोंगरावर सी.सी.टी.(C.C.T.) चे केले होते. या C.C.T.चे आखून देण्याचे काम वॉटर फाउंडेशनचे श्री दातीर साहेब यांनी केले त्यानुसार पाच दिवसात ग्रामस्थ व शिबीरार्थींनी 10 एकरवर C.C.T. चे काम केले. तसेच रंगनाथ बोडखे यांच्या तलावातील गाळ काढण्यात आला. अशा प्रकारे श्रमदानाचे राज्यस्तरीय शिबीरात कामे झाले. शिबीरातील मूलींची गावांनी खूप काळजी घेतली. त्यामूळे शिबीरार्थी विद्यार्थी खूप खूष झाले.

शिबीरातील मूलांना मा.पोपट पवार, मा.कृष्णा भोगे (विभागीय आयूक्त, औरंगाबाद) मा.नागनाथ कोतापल्ले (कुलगुरु) मा.निलोफर मॅडम (N.S.S.राज्य प्रमूख) मा.मल्लानाथ कलशेट्टी (सचिव महाराष्ट्र शासन) इ. मान्यवरांनी विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले तसेच जांभूळे सर, संपत चाकणे, कोल्हे सर (अ.नगर) इ. व्यक्तींनी मार्गदर्शन केले रात्री सांस्कृतिक कार्यक्रमामूळे विदयार्थी व ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात मनोरंजन होत असे. या शिबीरामूळे आनंदवाडी गावाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात झाले. कारण संपूर्ण महाराष्ट्रातून या शिबीरासाठी मूले आले होते. व त्यांची जेवन, राहणे, तसेच सकाळी उठून शौचालयाला बाहेर न जाता ज्या थीमवर शिबीर होते त्याचा वापर प्रत्येक विद्यार्थी ग्रामस्थ करत होते. सार्वजनिक शौचालयाचे यूनिट कमी पडत असल्यामूळे ग्रामस्थांनी स्वतःचे शौचालय तसेच घरे एन.एस.एस. विद्यार्थ्यांसाठी मोकळी ठेवली होती, मुलांनी शिबीर झाल्यावर ज्या प्रतिक्रिया दिल्या होत्या, त्या गावाच्या दृष्टीने फार सकारात्मक होत्या. त्यांनी आनंदवाडी गावाचे गुण गौरव काढले ''या आनंदवाडी गावात आम्हाला पाच दिवस खूप आनंद मिळाला, नावा सारखच हे गाव पाहुण्यांना आनंदी ठेवण्याचे काम ग्रामस्थ व मुले करतात'' अशा प्रकारे आनंदवाडीचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात N.S.S. मूळे झाले. याच शिबीरामूळे प्रा.राम बोडखे यांना विद्यापीठाचा तसेच महाराष्ट्र

शासनाचा उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पूरस्कार मिळाला. गावाबरोबर प्रा.राम बोडखे यांच्या कार्याचाही परिचय झाला.

# प्रकरण चौथे

## आनंदवाडी गावाची पाणीपूरवठा

## योजना

# प्रकरण चौथे

# आनंदवाडी गावाची पाणीपूरवठा योजना

आनंदवाडी गावाची एकी व गावातील यूवकांचा उत्साह मोठा होता. त्यांना श्रमदानाची आवड खूप होती. आनंदवाडी गावाने सन 2007 मध्ये गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त कडा येथील बस स्टँड व पंचायत समीती आष्टी हा परीसर झाडून स्वच्छ केला. यात 80 यूवक होते. मा.अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन पाठिंबा दिला या सर्व कार्यामूळे आनंदवाडी गावचे नाव चांगल्या दृष्टीने घेतले जात असे.

प्रा.राम बोडखे यांनी ग्रामसेवक प्रकाश शिंगे यांना धोंडे कॉलजच्या कॅन्टीनवर बोलावून जलस्वराज्य योजनेत भाग घ्यावयाचा आहे म्हणून फार्म भरला मा.हरीदास साहेबांची भेट घेऊन गावाच्या सहभागाची मागणी केली. मा. हरदास साहेबांनी जलस्वराज योजनेत सराटे-वडगाव आनंदवाडी गावाची निवड केली. निवड झाल्यावर अध्यक्ष-सचिवाची निवड करावयाची होती. गावात बैठक झाली. ज्यांनी योजना आणली त्यांना योजनेत घेतले नाही दूसरेच अध्यक्ष- सचिव निवडले गेले. योजना आणणाऱ्याला काहीच विचारले नाही व त्यांनी सराटेवडगांवातील काम सुरु केले परंतु आनंदवाडी गावात काम सुरु करण्यास त्या कमीटीचा विरोध होता. शेवटी श्री.भानूदास बोडखे, देविदास सुंबरे व प्रा.राम बोडखे यांनी श्रमदानाने विहीर खोदण्याचे ठरविले त्यानुसार विहीर कोठे करायची हा प्रश्न होता. परंतु प्रा.राम बोडखे यांच्या शेतात 1972 मध्ये एक श्रमदानातून विहीर खोदली होती ती मातीने बुजली होती त्या काळात ती विहीर दोन परस खोदली होती. तीच विहीर खोदण्याचा विचार आम्ही ग्रामस्थांनी केला. श्रमदानाचे काम आम्ही पहाटे 5 ते 8 वाजेपर्यंत केले जात असे अशा प्रकारे चार-पाच परस विहीर खोदली ही माहीती मा.हरदास साहेबांना प्रा.राम बोडखे यांनी सांगितली तसेच वारंवार बीडला भेटी घेऊन आनंदवाडीसाठी वेगळी योजना करावी अशी विनंती केली. त्यानूसार हरदास साहेबांनी महाराष्ट्रात अपवाद एकच ग्रामपंचायतला दोन कमीटी करुन पाणीपूरवठ्याचे

दोन खाते कडा येथील इंडीया बँकेत काढण्याची परवानगी दिली. या दोन्ही गावाची 52 लाखाची योजना होती. आनंदवाडीसाठी 17 लाखाची योजना मंजूर केली. यामध्ये विहीर, टाकी, पाइपलाईन अशी मंजूरी होती त्यानुसार आमची विहीर पूर्ण झाली. टाकी पूर्ण करणे गरजेचे होते. त्यानुसार टाकीसाठी पैठण येथून वाळू आणली व भास्कर गांगर्डे यांना टाकीचे काम दिले तसेच गावामध्ये गटारीची योजना सुध्दा केली. टाकीचे काम झाल्यानंतर पाइपलाइन केली. पाईपलाईनसाठी फिनोलेक्सचे पाइप वापरले. तसेच स्टँड पोस्ट न काढता 96 कनेक्शन घरोघरी देण्यात आले. एकाकडूनही पैसे घेतले नाही. सन 2007 मध्ये दिपावलीच्या पाडव्याला ही योजना चालू केली तिचे व्यवस्थापन पाहण्याचे काम श्री रावसाहेब बोडखे यांना देण्यात आले ते रोज सकाळी पाणी सोडत असे अशाप्रकारे आनंदवाडी गावातील ग्रामस्थांनी श्रमदानातून सुरु केलेली पाणीपूरवठ्याची योजना पूर्ण केली. या योजनेमूळे डोंगरातले पाणी गावाला पिण्यासाठी मिळाले. ग्रामस्थांचे आजार कमी झाले. ग्रामस्थ खूप खूप खुष झाले हे सर्व होऊ शकले ते केवळ श्रमदानामूळे. गाव हागणदारी मूक्त झाले. तसेच पाणी नव्हते ते शुध्द जलस्वराज योजनमूळे पाणी मिळाले. या योजनेसाठी महत्वाची भूमिका होती ती प्रा.राम बोडखे, देविदास झुंबरे, भानूदास बोडखे, सुरेश गुणानाथ बोडखे यांची. सुरेश हा सर्व ठराव व हिशोब लिहीण्याचे काम करत असे. महाराष्ट्रात आदर्श स्वरुपाची जलस्वराजची योजना झाली.

मा.हरदास साहेबांनी ही योजना देण्यासाठी सहकार्य केले. तसेच याचा पाठपूरावा प्रा.राम बोडखे व हेमाली बोडखे यांनी बीडला जाऊन केला. त्यामूळे योजना चांगली करता आली. ह्या योजनेतून उरलेल्या पैशामधून आनंदवाडीत मूलांना खेळण्या, गावाला कलर, कमान, रस्ते, मूलांना टि शर्ट, काही लोकांचा मजूरीचा पगार तसेच 1 लाख 70 हजाराचे भरलेली 10टक्के रक्कम वाढून ती 2 लाख 50 हजारापर्यंत दिली. अशा प्रकारे उरलेल्या पैशात गाव विकासाचे काम केले.

योजना चांगली झाल्यामूळे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील अधिकारी योजना पाहण्यासाठी गावाकडे आले तेव्हा जलतज्ञ राजेंद्रसिंह राणा हेही या कामीटीत आले त्यांनी

विहीरीजवळ सिमेंट बंधारा बांधण्यासाठी परवानगी दिली. बंधारा बांधून पूर्ण झाला परंतु बील काढण्यासाठी गेलो असता बंधाऱ्याचे बील मिळाले नाही. त्याकाळातील दोन लाख रुपये मंजुर झाले होते. परंतु गावातील विरोधामूळे ते मिळाले नाही. परंतु या बंधाऱ्यामूळे अनेक विहीरींची पाणीपातळी वाढली हेच खरे मंजुर झालेले बील होते.

# प्रकरण पाचवे

## प्रा.हेमाली बोडखे सरपंच व गावाला

## चार पूरस्कार

## प्रकरण पाचे

## प्रा.हेमाली बोडखे सरपंच व गावाला चार पूरस्कार

आनंदवाडी गाव हागणदारीमूक्त करणे असो किंवा जलस्वराज्य योजना उत्कृष्ट राबविणे असो यामूळे प्रा.राम बोडखे यांची प्रतिमा गावात चांगली झाली. याच काळात सराटेवडगाव ग्रामपंचायतची निवडणूक लागली होती. आनंदवाडीत तीन सदस्य होते तर गावात चार सदस्य असे एकुण सात सदस्य ची ग्रा.पं.ची बॉडी होती.गावामध्ये दोन पॅनल पडले तर तिसरा प्रा.राम बोडखे यांच्या नेतृत्वाखाली चार सदस्यांचा एक पॅनल पडला. असे तीन पॅनल गावात पडले. आनंदवाडीत तीन पैकी दोन सदस्य निवडून आले. 1) हेमाली बोडखे 2) सर्जेराव गायकवाड तसेच देविदास सुंबरे यांची पत्नी पराभूत झाली. तसेच सराटेवडगावमध्ये महादेव बोडखे एक मताने निवडून आले. असे आमचे तीन सदस्य झाले बहूमतासाठी चार सदस्य पाहीजे होते परंतु समारच्या पॅनलमध्ये प्रा.राम बोडखे यांची बहीण रतनबाई नन्नवरे निवडून आल्या होत्या. महीला सरपंचाचे पद हे राखीव होते. त्यानूसार प्रा.हेमाली रामकृष्ण बोडखे ह्या सराटेवडगाव आनंदवाडी गावाच्या सरपंच झाल्या तर उपसरपंच सर्जेराव गायकवाड यांना केले.

ग्रामविकासाला सुरवात करतांना सराटेवडगाव येथील महादेव मंदीराचे शिखराचे काम भरपूर दिवसापासून रेंगाळलेले होते. तेच काम प्रा.राम बोडखे यांनी आई कै.शांताबाई बोडखे यांच्या स्मरणार्थ सुरु करून मंदीराच्या शिखराचे काम स्वतःच्या पैशांनी पूर्ण केले परंतु कलशारोहण अपूर्ण राहीले. आनंदवाडी गाव हागणदारी मूक्त झाले होते. परंतु सराटेवडगाव हागणदारीमूक्त झाले नव्हते. त्यानूसार सराटेवडगाव मध्ये हागणदारी मूक्ती साठी पैसे नसल्यामूळे प्रा.हेमाली बोडखे यांचे पाच तोळ्याचे सोन्याचे गंठण फूलुकाका यांच्या दूकानात मोडले त्याचे साठ हजार व हरदास साहेबांकडून 1 लक्ष रुपये जि.प.मधून घेतले अशा 1 लक्ष साठ हजार रुपयात 45 शौचालयाचे काम सराटेवडगावात पूर्ण केले. व सराटेवडगाव हे गाव हागणदारी मूक्त केले अशा प्रकारे सराटेवडगाव-आनंदवाडी गावाला निर्मलग्राम पूरस्कार प्रा.हेमाली बोडखे सरपंच असताना

राष्ट्रपतींच्या हस्ते मिळाला. ज्या आनंदवाडी गावात सर्वप्रथम शौचालय बांधण्यासाठी आग्रह धरला होता त्याच प्रा.हेमाली बोडखे यांना सरपंच झाल्यावर पूरस्कार मिळाला हे कर्मफळ म्हणावे लागेल.

सराटेवडगाव आनंदवाडी गावाला निर्मलग्राम पूरस्कार मिळाल्यानंतर गावाने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात भाग घेतला गावाने तालूक्याचा पूरस्कार जिंकला त्यानंतर गावांनी जिल्ह्याची तयारी सुरु केली.

गावात दलीतवस्तीचा रस्ता व सहा घरकुल हरदास साहेबामूळे मिळाले. तसेच गावात 15 विहीरींना मंजूरी मिळाली रस्त्याचे काम पैठणची वाळू वापरुन केले तसेच या कामाचे बद्रीनाथ महाराजांनी उद्‌घाटन केले होते.

जिल्हा तयारी जोरदार सुरु करुन सराटे वडगाव गावालाही गुलाबी कलर देण्यात आला. तसेच गावातील मारुती मंदीरच्या भिंतीवर चित्र काढले. गावात भिंतीवर चित्र काढण्यात आले.

जिल्ह्याची तयारी चालू असताना श्री देविदास सुंबरे यांनी विष घेतले ते कुणाचेच ऐकत नव्हते त्यांच्या घरच्यांनी राम बोडखेसरांना बोलावले त्यांनी सुंबरेंना कडा येथील गांधी हॉस्पीटलमध्ये नेले उशीर झाल्यामूळे यांचे नगरला निधन झाले दहावा होण्याच्या आत काही लोकांनी षडयंत्र रचून राम बोडखे मूळेच देविदासने औषध घेतले असल्याचा आरोप केला कारण त्यांना गावातील विकासकामे तसेच जलस्वराज योजना ताब्यात घेण्यासाठी दबावतंत्राचा वापर करावयाचा होता.परंतु ती योजना सरपंच हेमाली बोडखे यांनी घेतलीच नाही.

सराटेवडगाव येथील शाळेला कंपाऊंड केले. तसेच लहान मूलांना खेळण्या बसवित असताना पांडू शिंदे व तान्हाजी सुंबरे यांनी दारु पीऊन विरोध केला. शिवीगाळ केली. बी.डी.ओ. मॅडम गावात आल्या होत्या. कारण दूसऱ्या दिवशी जिल्ह्याची टीम येणार होती. मंडप दिला होता. तो काढण्यासाठी भाऊ तरटे यांनी रात्री दारु पीऊन कंपाऊंड तोडले त्यामूळे सराटेवडगाव येथील स्वागताचा कार्यक्रम रद्द करुन आनंदवाडीला घेतला आनंदवाडी गावाने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्ह्यात प्रथम सन 2006-07

चा पूरस्कार जिंकला गावाला पाच लक्ष रुपयाचे बक्षिस मिळाले गावाचे नाव संपूर्ण मराठवाड्यात झाले महाराष्ट्रात झाले गावातील काही लोकांना हे काम चालू द्यायचे नाही म्हणून मोठ्या प्रमाणात विरोध केला. 5 लक्ष रुपयाचे बक्षिस आणण्यासाठी सरपंच पती राम बोडखे यांनी 2 लक्ष रुपयापर्यंत अगोदर खर्च केले तेव्हा कुठे गावाला 5 लक्ष रुपयाचा पूरस्कार मिळाला होता.

बक्षिस रकमेतून सराटेवडगाव-आनंदवाडी शाळेची रंगरंगोटी, ग्रामपंचायत कार्यालय सुधारणा तसेच शाळेतील मूलांना 100 बेंच, मूलांना टी शर्ट, कॉम्पुटर इ. ठिकाणी सर्वांना सांगुण खर्च केले. परंतु बक्षिसात भ्रष्टाचार झाला म्हणून गावातील चार लोकांनी विरोध करण्यास सुरुवात केली.

याच काळात गावातील जानपीर यात्रेत बँड फोडले काही लोकांनी बक्षिसातील 50 हजाराची मागणी केली. ती दिली नाही त्यामूळे गावात विकास कामाला विरोध करण्यास सुरुवात केली रात्री महीला ग्रामसभा घेतली की दारु पीऊन विरोध केला जाऊ लागला तसेच राम बोडखे यांच्या घरी देविदास सुंबरे यांचे पाहूणे येऊन भांडण शिवीगाळ करत असे अशा प्रकारे त्रास देण्यास सुरुवात केली.

मा.भिमराव धोंडे व दरेकर नाना यांनी आनंदवाडीला येऊन हे प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला तेव्हा देविदास सुंबरे यांच्या निधनाबद्दल प्रा.राम बोडखे यांना 5 लक्ष रुपये द्यावेत अशी मागणी केली राम बोडखे यांचा दोष फक्त ते देविदास सुंबरे यांचे मित्र होते हाच होता. जर तुम्ही पैसे दिले नाही तर प्रा.राम बोडखे यांना आम्ही मारुन टाकू अशी धमकी देत होते परंतु सरपंच हेमाली बोडखे यांच्या सहकार्याने धीर धरुन आम्ही देविदासला वाचविण्याचाच प्रयत्न केला होता असे सांगत होतो. परंतु गावापूढे काही करता येत नव्हते.

बक्षिस रकमेत भ्रष्टाचार झाला म्हणून पंचायत समिती आष्टी येथून आमदार सुरेश धस यांनी अधिकाऱ्यांवर दबाब आणून चौकशी लावली पहिल्या चौकशीत आनंदवाडी येथे प्रा.राम बोडखे यांना देविदस सुंबरे यांच्या भावाने हाणले तसेच चौकशीत सारखा व्यत्यय आणला जात असे चौकशी करुन दिली जात नव्हती. अशा

बक्षीसाच्या आठवेळा चौकश्या झाल्या. सराटेवडगाव येथील चौकशीवेळी पून्हा भांडण झाले अशा प्रकारे दोन केस एकमेकाविरुध्द होऊन गावाचा जो चाललेला विकास होता तो पूर्ण थांबला व गावाने भांडणाचे स्वरुप घेतले जे गावाचे नाव सर्वत्र चांगले म्हणून होते ते भांडणामूळे वर्तमान पत्रात व टिव्हीवर येऊ लागले. गावाची पूर्ण बदनामी झाली. केसेस मध्ये एकमेकाविरुध्द 40 लोकांची नावे पडली प्रत्येक तारखेला या लोकांना आष्टी कोर्टात जावे लागत असे. बक्षीस रकमेची चौकशी आष्टीवरुन बीडला, बीडवरुन औरंगाबादला, औरंगाबाद वरुन मुंबईत मंत्रालयात अशी पाच वर्षे चालली परंतु बक्षीस रकमेत कसलाच भ्रष्टाचार झाला नव्हता फक्त त्रास देण्याचे काम राजकीय दबावापोटी आ.सुरेश धस हे करत होते. परंतु या सर्व प्रकारणामूळे प्रा.राम बोडखे व त्यांची टिम यांना पोलीस, कोर्ट यांची सर्व माहिती झाली. शेवटी कंटाळून आम्ही दोघांनी एकमेकांच्या केसेस परत घेतल्या.

प्रा.हेमाली राम बोडखे यांनी फक्त दिड वर्षे काम करुन निर्मल ग्राम, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता पूरस्कार, पर्यावरण ग्रामसमृध्द योजनेचे 9 लक्ष रुपयाचे बक्षिस मिळविले परंतु ग्रामपंचयायत निवडणूकीत प्रा.राम बोडखे उभे राहीले ते केवळ चार मतांनी पराभूत झाले त्यानंतर त्यांनी ग्रामपंचायतीचे तोंडही पाहीले नाही. मधल्या काळात निळकंठ सुंबरे सरांची पत्नी सरपंच झाली या पाच वर्षात एकही पूरस्कार गावाला मिळाला नाही. तसेच नाविन्यपूर्ण एकही काम झाले नाही. राम बोडखे हे मूलांच्या शिक्षणामूळे नगरला राहण्यासाठी गेले त्यांनीही गावाकडे लक्ष दिले नाही. जे 9 लक्ष रुपयाचे बक्षिस आले त्याचे 6 लक्ष रुपये सुंबरे सरपंच असताना खर्च केले या बक्षिसाची कोणी चौकशी लावली नाही किंवा केली नाही. फक्त राम बोडखे यांना त्रास देणे हाच उद्देश होता. कारण ते पैसे कोणाला न देता गावाचा विकास केला.

महाराष्ट्र शासनाने जनतेतून सरपंच निवडण्याची घोषणा केली. त्यामूळे पून्हा सराटेवडगाव-आनंदवाडी गावातील यूवक महीला ग्रामस्थांनी पून्हा प्रा.राम सरांना निवडणूकीत उभे रहा असे सांगितले परंतु सर्वांना एकत्र घेऊन उभा राहण्याचा निर्णय झाला. त्यानुसार मा.धोंडे साहेबांनी रामलाच उभे करा असे सांगितले. त्यानूसार फॉर्म

भरला विरोधात कोंडीभाऊ झांबरे हे चांगले व्यक्ती उभे होते. या निवडणूकीत प्रा.राम बोडखे 132 मतांनी विजयी झाले त्यांनी निवडणूकीनंतर गावातील पहीले PSI बंडू साळवे झाले होते त्यांचा सत्कार कोंडीभाऊ झांबरे यांच्या हस्ते केला व येथून पूढे गावाचे राजकारण हे राजकारणासाठी न करता आता आपण सर्व मिळून गावाचा विकास करु असे मत मांडले. सर्वांनी या गोष्टीला पाठींबा दिला. अशा प्रकारे गावात निवडणूक झाल्यावर एकोपा करण्याचे सर्वांनी प्रयत्न केले होते. कारण की पाठीमागे त्यांनी पाहीले विरोध केल्यावर गावाचा विकास न होता उलट गावाचे वाटोळे झाले.

प्रा.राम बोडखे सरपंच झाल्यावर गावात त्यांनी पून्हा नविन चैतन्य आणण्यासाठी सुरुवात करण्याचे ठरविले. त्यानुसार सराटेवडगाव येथे आनंदाराव धोंडे कॉलेजचे शिबीर आणले य शिबीरात महादेव मंदीर, मस्जिद, व ग्रा.पं. कार्यालयाला कलर दिला. सर्व परिसर स्वच्छ केला. शौचालय स्वच्छ केले. गावातील मूलांचे, ग्रामस्थांचे रात्रीच्या कामातून मने वळविली. गावात पून्हा सुधारणेची चळवळ सुरु केली. शिबीर समारोपात मा. आमदार भिमराव धोंडे साहेबांनी 52 लक्ष रुपयाचे गावाला काम दिले. गावासाठी खूप महत्वाचे होते. अशा प्रकारे गावातील सर्व लोकांनी साथ दिली.

आनंदवाडी गावात मोतीलाल कोठारी महाविद्यालयाचे N.S.S. शिबीर घेतले. तेथेही आठ वर्षापासून कोणताच समाज प्रबोधनाचा कार्यक्रम झाला नव्हता तो सुरु करण्याचे काम N.S.S.मूळे यशस्वी झाले आनंदवाडी गावातही मंदीर, शाळा, शौचालय, यांना कलर देऊन स्वच्छ केले पाणी पूरवठ्याची योजना चांगली चालू केली ग्रामस्थांमध्ये पून्हा नवचैतन्य आणले. याच काळात महाराष्ट्रात पाणी फाऊंडेशनची चळवळ होती. ती चळवळ आपल्या आष्टी तालूक्यात चालावी असे प्रा.राम बोडखे यांना मनोमन वाटत होते. त्याच दृष्टीने ग्रामविकासाची N.S.S.मधून पून्हा सुरुवात केली. आष्टी तालूका पाणी फाऊंडेशन मध्ये आला त्यानूसार आनंदवाडी गावाने भाग घेण्याचे ठरविले.

# प्रकरण सहावे

## सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धेचे राज्यात तिसरा पुरस्कार

# प्रकरण सहावे

# सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा : आनंदवाडीला राज्यात तिसरा पुरस्कार

**पाणी फाऊंडेशन स्पर्धेची पूर्व तयारी :-**

आष्टी तालूका पाणी फाऊंडेशन स्पर्धेसाठी निवडला गेला. हे समजल्यावर काही यूवक व ग्रामस्थाशी सरपंच, सदस्य यांनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठीची चर्चा केली या स्पर्धे साठी ग्रा.पं.ही अट नसताना ते गाव मौजे असावे अशा प्रकारची अट होती मागीलवर्षी स्पर्धेविषयी ऐकले व टी.व्ही.वर पाहण्यात आले होते. ही स्पर्धा प्रदिर्घ दिवसाची असुन या स्पर्धेत भाग घेतला तर गाव पाणीदार होते. (म्हणजे पाणी आडवणे व जिरवणे) आमच्या गावाची फार वर्षा पासून पाणी व्यवस्थापनाची इच्छा होती. परंतु तशी संधी आजपर्यंत आली नव्हती परंतु पाणी फाऊंडेशन व बीजे एस (भारतीय जैन संघटना) या दोन संघटनांनी मागील वर्षी महाराष्ट्रात चांगले काम केले तर गावाचा कायापालट होतो ही कल्पना ग्रामस्थांना होती. तसेच गावाला पूर्वीचा श्रमदान करण्याचा अनुभव होता हाच विचार करुन स्पर्धेपूर्वी दोन महीने अगोदर मनात या स्पर्धेमध्ये भाग घेण्याचा संकल्प सरपंच व ग्रामस्थांनी घेतला.

पाणी फाऊंडेशनमध्ये जे तालूका समन्वयक प्रविण काथोटे होते त्यांनी सरपंचाना वारंवार फोन करुन स्पर्धेत भाग घेण्याचा आग्रह केला प्रविण सरांबरोबर सरपंच प्रा.राम बोडखे यानी सविस्तर चर्चा केली. जर स्पर्धेत भाग घेतला तर जलसंधारणा बरोबरच गावातील ग्रामस्थांचे मनसंधारणही होते. त्यामूळे ग्रामविकास नक्कीच होतो हा मंच आम्हाला प्रविण सरांनी सांगितला होता. तसेच सरपंचांची अण्णा हजारेंवर पी.एच.डी. चालली होती. त्या संशोधनात ग्राम विकास जर करावयाचा असेल जलसंधारणा शिवाय पर्याय नाही याची जाणीव सरपंचाला असल्यामूळे स्पर्धेत भाग घ्यायचा निर्णय सरपंचाच्या मनात आला व त्यांनी गावातील जनतेला व यूवकांना, महिलांना महत्व पटवून

देऊन भाग घेण्याविषयी मन वळविण्याची सुरवात केली. या मनवळविण्याच्या चळवळीत ग्रामस्थांचा चांगला सहभाग सरपंचाना मिळत गेला.

पाणी फाऊंडेशनमध्ये भाग घेण्याचा ग्रामसभेत ठराव घेतला तेव्हा सर्व ग्रामस्थांनी एकमताने सराटेवडगाव आनंदवाडीने भाग घेण्याचे ठरविले होते. सराटेवडगाव व आनंदवाडीचे स्पर्धेसाठी वेगवेगळी फॉर्म भरले होते. कारण ह्या स्पर्धेमध्ये मनुष्यबळासाठी प्रतिव्यक्ती 6 घनमीटर काम करणे महत्वाचे होते. त्यामूळे आनंदवाडी मौजे गाव असल्यामूळे स्पर्धेत वेगळा फॉर्म भरला होता. कारण त्यामूळे स्पर्धा सोपी जाईल व दोन्ही गावात स्पर्धा लावता येईल व त्यामूळे दोन्ही गावात श्रमदानाची ज्यादाची कामे होतील व जलसंधारणाची कामे होऊन दोन्ही गावे पाणीदार होतील हा उद्देश होता.

पाणी फाऊंडेशनमध्ये भाग घेण्याचा पहीला फॉर्म आनंदवाडी / सराटेवडगाव गावाचा भरला. गावांनी पाणी अडविण्याच्या स्पर्धेत भाग घेतला अशी चर्चा सर्व गावात चालली. गावात स्पर्धेविषयी मन वळविण्याचे काम ग्रामस्थ करत होते. तसेच यूवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग वाढत होता. आनंदवाडीच्या यूवकांच्या मनात पाणी अडवणे व जिरवण्याचे काम व्हावे असे मनोमन होते कारण आनंदवाडी मध्ये यापूर्वी जलस्वराजची विहीर श्रमदानात चार परस खोदली होती. त्याचे पाणी अजुनही आनंदवाडी ग्रामस्थ पीत आहे तसेच श्रीमती रंगुबाई लक्षमण बोडखे ह्या सरपंच असताना आंनदवाडी गाव श्रमदानातून हागणदारी मूक्त करण्यात आले होते. तसेच आनंदवाडी गावातील यूवकांनी अनेक वेळा सराटेवडगाव-आनंदवाडी रस्ता श्रमदानातून केला आहे. तसेच गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता म्हणून कडा येथील एस.टी.डेपोचा परिसर स्वच्छ केला. आष्टी प.स.स्वच्छ केली. मदन महाराज येथील सप्ताहाची समाप्ती झाल्यानंतर परिसर स्वच्छ करुन दिला होता. अशा प्रकारे श्रमदान व स्वच्छतेची आवड आनंदवाडी ग्रामस्थांना होती. यामूळे या पूर्व संस्कारावरुन आनंदवाडी गाव स्पर्धेत भाग घेऊन राज्यात गावाचे नाव मोठे करील अशी आशा प्रवीणसरांना व सरपंचांना होती त्याच हेतूने स्पर्धेत सहभागी होऊन ग्रामस्थांचे मन वळविण्यास सुरुवात झाली.

पंचायत समिती आष्टी येथे एक दिवसाची पाणी फाऊंडेशनची कार्यशाळा ठेवली होती. त्या कार्य शाळेसाठी मा.आमदार भिमरावजी धोंडेसाहेब. जि.प.अध्यक्षपती विजय गोल्हार, प.स.सभापती युवराज पाटील, श्री बाळासाहेब आजबे, जयदत्त धस हे राजकारणी तर मा.रामेश्वर गोरे (तहसिलदार) साहेब, मा.सरगर साहेब (गट विकास अधिकारी) पाणी फाऊंडेशनचे मराठवाडा प्रमुख श्री. संतोष शिनगारे, तालुका समन्वयक श्री प्रविण काथवटे, श्री कैलास पन्हाळकर, व श्री संभाजी इंगोले, इ.मान्यवरांनी कार्यशाळा ओयाजित केली होती. यावेळी तालुक्यातील सर्व ग्रा.प.ना सहभाग घेण्यासाठी निमंत्रित केले होते. जवळ जवळ तालूक्यातील सर्वच सरपंच व ग्रामसेवक उपस्थित होते या कार्यशाळेत पाणी फाऊंडेशन स्पर्धेविषय सविस्तर प्रस्ताविक करण्यात आले. स्पर्धा कशी आहे याची तयारी कशी करावयाची हे सर्व संतोष शिनगारे सरांनी सांगितले.

कार्यशाळेत तालूक्यातील ठराविक सरपंचांना मनोगत मांडण्यासाठी संधी दिली होती. त्यात सराटेवडगाव आनंदवाडीचे सरपंच व कडा गावचे सरपंचपती श्री अनिल ढोबळे यांनी मनोगत मांडले श्री. राम बोडखे यांनी मनोगतामध्ये तालूक्यातील सर्व राजकारण्यांना विनंती केली की तुम्ही एकत्र येऊन पाणी फाऊंडेशन स्पर्धेत राजकारण न आणता सर्वांनी जर सहकार्य केले तर तालूक्यात पाणी आडविण्याचे व जिरवण्याचे काम खूप मोठ्या प्रमाणात होईल असे मनोगत मांडले होते.

बाळासाहेब आजबे (काका) या स्पर्धेतील श्रमदान हे अवघड आहे अशी भूमिका मांडली तसेच विजय गोल्हार यांनी जि.प.मधील इतर कामांची माहिती सांगितली तसेच तालूक्याचे आमदार भिमरावजी धोंडे साहेबांनी जे गाव तालूक्यात व राज्यात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवतील त्यांना अनुक्रमे 10, 5, व 3 लाख रुपयांचे बक्षिस जाहीर केले. या बक्षिसामूळे तालूक्यातील जादा गावांनी सहभाग घ्यावा व तालूका पाणीदार व्हावा हा धोंडे साहेबांचा उद्देश होता. कार्यशाळा संपल्यावर पाणी फाऊंडेशनने पं.सं.प्रांगणात स्पर्धे विषयी जागृती करण्यासाठी प्रदर्शनी ठेवण्यात आली होती. हे प्रदर्शन खूप चांगल्या स्वरुपाचे होते. त्यात मागील वर्षी ज्या गावांनी भाग घेतला त्यांचे कामाचे फोटो होते. स्पर्धेतील ज्या गावांनी बक्षिस मिळवले त्या गावातील काही लोकांचे

पोस्टरवर मनोगत होते. यामूळे लोकांना स्पर्धेविषयी आकर्षण निर्माण झाले. खूप लोकांनी या प्रदर्शनाला भेटी दिल्या त्यामूळे आष्टी तालूक्यातील जादा गावांनी स्पर्धेत सहभाग घेतला आनंदवाडी ग्रामस्थांनीही कार्यशाळेत सहभाग घेतला होता. तसेच स्पर्धेचा फॉर्म नं -2 याच कार्यशाळेत जमा करावयाचा होता तो करण्यात आला.

पाणी फाऊंडेशनच्या प्रशिक्षणासाठी प्रत्येक गावातील पाच प्रतिनीधी प्रशिक्षणासाठी राळेगणसिध्दी किंवा हिवरे बाजार येथे पाठविण्यासाठी निवड करावयाची होती. सरपंच डॉ.राम बोडखे हे अनंदराव धोंडे कॉलेजवर प्राध्यापक असल्यामूळे त्यांनी सराटेवडगाव-आनंदवाडी गावात राष्ट्रीय सेवा योजनचे शिबिर आयोजित करुन दोन्ही गावांतील लोकांचे मन जुळविण्याचे व गाव स्वच्छ करण्याचे काम चांगले झाल्यामूळे सर्व लोक सुधारणेच्या चळवळीत घेऊन ग्रामस्थांना ही श्रमदान करावयाचे आहे याचे महत्व पटवून देण्यात आले. तसेच श्री श्री रविशंकरजी यांच्या शिष्यांचा तीन दिवसाचा N.S.S. मध्ये एक कोर्स घेण्यात आला. त्यामूळे मूलांना व ग्रामस्थांना श्रमसंस्काराचे महत्व पटले तसेच N.S.S. मध्ये जी व्याख्याने झाली त्यामूळेही लोकांना ग्रामविकासाचे महत्व पटवून देण्यात आले. याचाच फायदा ग्रामस्थांना होऊन मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ या स्पर्धेमध्ये सहभागी झाली. सराटेवडगाव-आनंदवाडी गाव हे N.S.S.मूळे स्वच्छ केली तसेच मनाचीही स्वच्छता करण्यात आली. हाच फायदा पाणी फाऊंडेशन मध्ये मोठ्या प्रमाणात झाला.

पाणी फाऊंडेशन मध्ये प्रशिक्षणासाठी पाच जणांची निवड करण्यात आली. त्यामध्ये डॉ.राम बोडखे (प्राध्यापक), शेख अझर (दूकानदार), राजू बोडखे (शिक्षक), गौतम बोडखे (यूवक), सौ.हेमाली बोडखे (शिक्षिका) हे सर्वात पाहिले प्रशिक्षणासाठी पाठविले प्रशिक्षण हे माणूस घडविण्याचे काम करत आहे. या प्रशिक्षणामूळे गावाचा विकास होईल. हे लक्षात आल्यानंतर सरपंचांनी पून्हा तालूका समन्वयक यांना विनंती केली की जर काही गावातील लोक गेले नाही तर आमच्या गावातील काही लोकांना आम्ही पाठवण्यास तयार आहोत. कारण प्रशिक्षण करुन आलेला प्रशिक्षक नक्कीच पाणी फाऊंडेशन मध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी स्वतः होते. व इतरांनाही सहभागी करुन घेण्याची कला त्याला प्रशिक्षणामूळे मिळते हे पहिल्या वेळेस प्रशिक्षणास गेलेल्या

प्रशिक्षकांना समजली होती. त्याचमूळे गावातील इतर लोकांनाही प्रशिक्षणासाठी पाठविण्यास सरपंचांनी तालूका समन्वयकांना विनंती केली.

राळेगणसिध्दी येथे पाणी फाऊंडेशनचे प्रशिक्षण झाले ह्या प्रशिक्षणामूळे आम्ही सर्व प्रशिक्षक इतके प्रभावित झालो की आपले आनंदवाडी गाव हे (45) दिवसात पाणीदार करण्याचा संकल्प सर्वांनी मनात बांधूनच राळेगणसिध्दी येथून प्रेरणा घेऊन आले राळेगणसिध्दी हे देशातील पहीले पाणलोट झालेले आदर्श गाव होते ही सर्व प्रशिक्षकासाठी एक प्रेरणा होती. हे गाव मा.अण्णा हजारेंमूळे आदर्श होऊ शकले असेच अण्णा हजारे प्रशिक्षणातून तयार व्हावे हाच उद्देश पाणी फाऊंडेशनचा असावा त्यामूळेच राळेगण सिध्दी व हिवरेबाजार येथे पाणी फाऊंडेशनचे प्रशिक्षण ठेवले असावे.

पाणी फाऊंडेशनचे पाच दिवसाचे प्रशिक्षण राळेगण येथे झाले प्रशिक्षणाची वेळ सकाळी 7.30 वाजल्यापासून रात्री 8.30 वाजेपर्यंत होती या पाच दिवसात जलसंधारणा बरोबर आमचे मनसंधारणही करण्यात आले प्रशिक्षणात श्री देविदास पवार व त्यांच्या टिमने एवढे उत्कृष्ट प्रशिक्षण दिले की प्रशिक्षण काळात त्यांनी बोअरचे जे प्रात्याक्षिक करुन दाखविले त्यावेळी लोकांच्या डोळ्यात पाणी आले हे प्रशिक्षण प्रत्यक्ष कृतीतून दाखवित असल्यामूळे खूप प्रभावी होते आम्हा सर्व प्रशिक्षणार्थींना ते ऐवढे प्रभावित करुन गेले की आमचे आनंदवाडी गावही राळेगणसिध्दी सारखे करण्याचा आम्ही सर्वांनी संकल्पच केला पशिक्षण घेऊन गावात पाउल ठेवले व कामाला सुरुवात केली.

होळीचा दिवस (धूलीवंदन) होता त्या दिवशी गावात रंग मोठ्या प्रमाणात खेळला जातो त्या दिवशी आम्ही काही ग्रामस्थ जे पाणी फाऊंउेशन स्पर्धेमध्ये महाराष्ट्रात दूसरे गाव आले ते धारुर तालूक्यातील जायभायवाडी पाहण्यासाठी गेलोत तेथे डॉ जायभाय व पत्रकार महाजन यांची भेट घेतली सर्व गाव पाहीले त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात श्रमदानाचे काम केले होते त्यांच्याबरोबर स्पर्धेविषयी सविस्तर चर्चा केली व रात्री 12 वाजता आनंदवाडी गावात पोहोचलोत यानंतर सातारा जिल्ह्यातील वेळू व भोसरे गाव पाहीले या गावात प्रत्यक्ष जाऊन त्यांनी जी कामे केली ती पाहीली त्यामूळे आपण आपल्या गावात पाणी फाऊंउेशनचे काम करु शकतोत ही आम्हा सर्वांना खात्री पटली या गावाला जे

श्रमदानाचे काम झाले ते आपण करु शकतोत याची आम्हाला खात्री पटली गावामध्ये प्रोजेक्टरवर कार्यक्रम दाखवून ग्रमस्थांची रात्रीची ग्रामसभा घेऊन लोकांचे मन वळविण्याचे काम पाणी फाऊंडेशन तालूका समन्वयक करत होते. या कार्यक्रमांचा मोठ्या प्रमाणात फायदा गावाला झाला. अशाप्रकारे आमची सर्वांची पाणी फाऊंडेशनपूर्वी स्पर्धेची तयारी विषयी चर्चा होत असे अझर हा कधीच सामाजिक चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी नसे परंतु त्यांचे आजोबा कै शेख जाफरभाई यांनी आनंदवाडी गावातील तंबाखू, बीडी मावा इतर सर्व व्यसनाचे पदार्थ विकणे बंद केले होते. आनंदवाडी हे गाव चार वर्षे व्यसनमूक्त होते ते फक्त कै.शेख जाफरभाई यांचे योगदान होय. हाच समाजसेवेचा गुण पूढे अझर मध्ये आला असावा आणि तो पाणी फाऊंडेशन टीममध्ये सहभागी झाला. स्पर्धेची सर्व तयारी राजू बोडखे व शेख अझर यांनी सांभाळण्यास सुरुवात केली.

पाणी फाऊंडेशन स्पर्धा सुरु होण्यापूर्वी 20 मार्कांचे काम गावाला करता येत होते त्यानुसार गावात शोषखड्ड्याचे काम सुरु केले परंतु जनार्धन बोडखे यांचे शोष खड्ड्याचे काही पैसे राहीले होते त्यामूळे त्यांनी दोन खड्डे झाल्यानंतर खड्डे करण्यास विरोध केला परंतु आम्हाला प्रशिक्षणात वाद न करता गावात कामे झाली पाहीजेत हे सांगितल्यामूळे आम्ही सर्वांनी ते काम बंद करुन रोपवाटीका व इतर कामे करण्याचे ठरविले व त्या कामांना सुरुवात केली. स्पर्धा सुरु होण्यापूर्वी 20 टिकाव, 30खोरे, व 50 घमेले श्रमदानासाठी खरेदी करण्यात आले.

आनंदवाडी गावात याच काळात कै.रघूनाथ महाराज ऊंबरेकर यांचा नारळी सप्ताह होता .या सप्ताहाची सर्व तयारी सर्व ग्रामस्थांनी केली. सप्ताहासाठी प्रतिव्यक्ती 500 रु.वर्गणी ठरवली परंतु पाणी फाऊंडेशनला पाच पैसाही वर्गणी केली नाही. किंवा देण्यात आली नाही कारण लोकांना त्याचे महत्व नव्हते परंतु आम्हा यूवकांना वाटते होते सप्ताहातील काही पैसे शिल्लक राहून पाणी फाऊंडेशनला खर्च करावेत तसे ठरलेही परंतु उरलेले पैसे देण्यात आले नाहीत.सप्ताहामध्ये जे काही उरलेले साखर, तेल, पोहे इतर सामग्री नाष्ट्यासाठी देण्यात आले याच सप्ताहाच्या समारोपात पाणी फाऊंडेशनचे उद्घाटन करण्यात आले.

दि 7 एप्रिल 2018 ला रात्री 12:00 वा. बोरबनात पाणी फाऊंडेशनच्या कामाचे ह.भ.प. रंधवेबापू व पंढरीनाथ महाराजांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.रात्री 12:00 वा. गावातील 70 ते 80 मुलांनी श्रमदानाला सुरवात केली. रात्र असल्यामूळे मोबाईल बॅटरी, ट्रॅक्टरच्या प्रकाशात रात्री 2:00 वाजेपर्यंत मूलांनी बांध टाकण्याचे काम केले. पहील्याच दिवशीचे काम असल्यामुळे मूलांना काम करण्याचा जास्त मूड होता. दूसऱ्या दिवशी सकाळी 30 ते 40 ग्रामस्थ श्रमदानाला आली. बोरबनात श्रमदानाचे काम करणार होतो. त्याचदिवशी नारळी सप्ताहाचे काल्याचे कीर्तन होते तरीही काही लोकांनी श्रमदानाचे काम केले रात्री पून्हा 8:00 वाजता श्रमदानाला सुरवात केली. रात्री श्रमदान करण्यासाठी प्रकाश आवश्यक होता. प्रकाशासाठी मोबाईल, बॅटरी, ट्रॅक्टरचा वापर केला जात असे शेख इमामचा ट्रॅक्टर प्रवासासाठी वापरला. प्रा. हेमाली बोडखे हे महीलांचे मन वळविण्याचा प्रयत्न करत असे तर प्रा.रामकृष्ण बोडखे हे मूलांना व ग्रामस्थांना श्रमदानाला येण्यासाठी आग्रह करत होते. राजू अझर, गोरख, भानुदास बोडखे, हे लोकांना श्रमदानाला येण्याचा आग्रह करत होते. बांध टाकण्यासाठी माती पाहीजे होती त्यामूळे नांगरटीचे काम राउतात्या व माणिक यांनी केले. त्यामूळे खोदण्याचे काम वाचले. तालीला माती टाकण्याचे काम लवकर उरकून ताल (बांध) मोठा होत असे. तीन-चार दिवसाने लाइट व्यवस्था करावयाचे ठरले. जून्या मरकुरी, एलइडी लावण्यात आली. त्यामूळे काम ज्यादा झाले. रात्री काम संपल्यावर सर्वजण मिळून उद्या काय काम करावयाचे याचे नियोजन केले जात असे या श्रमदानासाठी लहान-मूलांपासून वयस्कर महीलांपर्यंत मोठया प्रमाणात ग्रामस्थ श्रमदानात सहभागी होत असे, या श्रमदानासाठी आनंदवाडी गावातील पक्ष विसरुन सर्वजण जलसंधारणासाठी एकत्र येत असत. सुरवातीला संख्या कमी होती ती वाढत जाऊन जवळ-जवळ 100 च्या पूढे गेली. पूरुषांएवढी महीलांची संख्या श्रमदानासाठी होती. बोरबन यतळमळा, खालचा मळा येथे बांध बंदिस्तीचेकाम करण्यात आले. यतळमळयात श्रमदान करण्यासाठी आमदार भिमरावजी धोडेसाहेब मा. रामेश्वर गोरे, मा.सरगर साहेब, दत्ता काकडे, पत्रकार उत्तम बोडखे, पांडूरंग बोडखे इ. मंडळी तसेच प.स.चा व तहसिलचा सर्व स्टाफ श्रमदानासाठी

आला. तसेच माजी. सी.इ.ओ. नामदेव नन्नवरे यांनीही भेट दिली व मार्गदर्शन केले. आनंदवाडीजवळ श्रमदान केल्यानंतर डोंगरावर सी.सी.टी चे काम करावयाचे होते. तसेच रात्रीची लाइटची सोय व्हावी म्हणून चार स्टॅण्ड व मरक्यूरी लॅम्प बनवून आणले. रात्रीच्या वेळी डोंगरावर श्रमदानाचे काम चालत होते तेव्हा त्या जागेला स्टेडीअमचे स्वरुप येत असे आनंदवाडी मंदीराजवळ इमाम व अमोल सुंबरे यांचा ट्रॅक्टर येत होता. त्यात लोक बसून श्रमदानाला येत असत. दिवसा सी.सी.टी. चे मार्कआउट करावयाचे व फक्की मारुन सर्व काम तयार ठेवले जात असे दर दिवसाला लाइटची व्यवस्था पाहवयाचे काम मारुतीसर गौतम, रामसर इतर तीन चार मूले दिवस मावळण्याच्या अगोदर काम करत होते हे मनूष्यबळाचे काम होते. तसेच दूसरे यंत्रकामाचेही काम सुरु होते.

8 एप्रिलला श्रमदानाचे काम सुरु झाल्यावर चार दिवसाने गावात एक पोकलॅन्ड आले. यांत्रिक काम पाहण्यासाठी सुरवातीला गोरख बोडखे यांना ठेवले त्याच्याच शेततलावाचे काम सुरु केले. परंतु त्याच्या शेतात जमीन कठीण गेल्यामुळे तेथील शेततलाव बंद केला. पूढे गोरखच्या घरी लग्न असल्यामुळे हे काम जयदीप बोडखे, सचिन वाघूले यांच्याकडे दिले. जवळ जवळ यंत्रकामाचे 21 शेततलाव आनंदवाडीत कारण्यात आले. त्यातील 19 इनलेट-आउटलेटचे शेततलाव केले तसेच उरलेले तीन प्लॅस्टीकचे शेततलाव होते. अशा प्रकारे आनंदवाडी गावात 21 शेततलावाचे काम करण्यात आले.

पाणी फाऊंडेशनचा 100 मार्काचा पेपर असल्यामूळे प्रत्येक काम व्यवस्थीत व क्वॉलीटीचे करणे गरजेचे होते. या दृष्टीने राजू, अजहर, गौतम मुकुंदा व रामसर हे कामची पाहणी करत असत. तसेच पाणी फाऊंडेशनचे तालुका समन्वयक प्रविण काथवटे, कैलास पन्हाळकर, सारखे मार्गदर्शन करत होते. याशिवाय आम्हाला जगदाळे सर, पोमणे सर, संतोष शिनगारे, गणेश काकडे यांनी कामाच्या गुणवत्तेवर कशा प्रकारे काम करावयाचे याचे सारखे मार्गदर्शन केले तसेच देविदास पवार सर हे सारखे मार्गदर्शन करुन मूलांमध्ये व ग्रामस्थांमध्ये नवचैतन्य आणण्याचे काम करत होते.

श्रमदान रात्रीचे करत असत त्या श्रमदान काळात ज्या व्यक्तींचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस असला तर केक आणून तो साजरा केला जात असे. असे वाढदिवस

प्रा.राम बोडखे, राजू बोडखे, जयदीप, नितीन, गणू, व अजहरच्या लग्नाचा वाढदिवस ही साजेरे केले गेले. अशा प्रकारे ग्रामस्थांमध्ये एक प्रेमाचे वातावरण तयार झाले. अशा प्रकारे गावात मनसंधारण होण्याचे काम कशानेच झाले नाही ते केवळ पाणी फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाने व गावातील श्रमदानाने होऊ शकले हे खूप मोठे कार्य श्रमदानाने आनंदवाडी गावात झाले.

ही चळवळ चालवण्यासाठी पैशाची गरज होती. परंतु गावकऱ्यांकडून आम्ही श्रमदानाची अपेक्षा केली कारण ते पैशाच्या स्वरुपात वर्गणी देऊ शकत नाही याची जाणीव आम्हाला होती. जेव्हा सप्ताहाचे 10 हजार बाकी होते ते डिझलसाठी देण्याची सर्व मूलांनी मागणी केली परंतु पैसे दिले नाही. त्यामूळे वर्गणी करण्याचे सोडून दिले. परंतु संदीप गायकवाड (जपान) 10,000/- रु. संदीप शेळके 10,000/- रु., दिलीप नन्नवरे 11,000/- रु., पोपट गोरे (तलाठी) 20,000/- रु., तसेच महाराष्ट्र शासनाचे 1,50,000/- रु. या व्यतीरीक्त लागलेले जवळपास 4 लाख रुपयापर्यंतचा खर्च प्रा.राम बोडखे यांनी तर राजू बोडखे 30 हजार, साईनाथ बोडखे 50,000/- व अनसर भाई 50,000/- रुपयेंची मदत पाणी फाऊंडेशन काळात केली. हे पैसे साहीत्य खरेदी करणे, लाईट, मंदीर कलर, रोपवाटीका, शोषखड्डे, ट्रॅक्टर डिझल टाकणे, गावामध्ये चित्र काढणे, मजूरी, तीन मनूष्यबळातील बांधाऱ्यासाठी लागणारे सिमेंट, खडी, वाळू, प्लेटा, पोकलॅन्डचे डिझल, गॅबियन बंधारा, पाट्याचा खर्च, बॅनर बनविणे फोटो शुटींग, चूना फक्की, इ. वर खर्च करण्यात आला. तो सर्व खर्च प्रा.राम बोडखे सरांनी केला अन्यथा राज्यपातळीपर्यंत गाव पोहोचू शकले नसते. मनूष्यबळातून जे तीन बंधारे केले. त्यामूळे आनंदवाडी गावाचे 1700 घनमीटरचे काम वाढले त्यामूळे आनंदवाडी गावाचे मनूष्यबळातील काम हे 7000 घनमीटर पर्यंत होऊ शकले हे काम बीड जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रातही खूप मोठ्या प्रमाणात होते. कारण आमच्या गावची लोकसंख्या 607 होती. श्रमदानाचे काम 3600 घनमीटर करण्याचे टार्गेट होते. परंतु ते आमचे काम 7000 घनमीटर पर्यंत गेले. त्यामूळेच गावाचे श्रमदानाचे काम मानसी 11 घनमीटर होऊ शकले.

आम्ही यतळमळा बोरबन, खालचा मळा येथील श्रमदानाचे जे काम केले त्याचे मोजमाप केले तेव्हा ते 1400 घनमीटर पर्यंत भरले होते. सी.सी.टी. चे काम होणे गरजेचे असल्यामूळे हे काम हाती घेतले. तेही पाच - सहा दिवस केले. त्यामूळे घनमीटर वाढत नव्हते त्यामूळे आम्ही कुरणात कंटूर टाकण्याचे काम केले. कंटूर मूळे आमचे काम जरा वाढत चालेले होते. थोडे समाधान मिळत होते. परंतु संतोष शिनगारे सरांनी सांगितले होते तुम्हाला जर राज्यात जायचे असेल तर तुम्हाला 7000 घनमीटर पर्यंत काम करणे गरजेचे आहे. त्यामूळे आम्ही कंटूरचे काम करण्यास सुरुवात केली. कंटूर हे शेतात मधोमध ट्यूब लेवलने ताल टाकणे. आम्हाला वाटले शेतकरी टाकू देणार नाहीत परंतु हे काम आम्ही सुरु केले याला कोणत्याच शेतकऱ्याने विरोध केला नाही. त्यामूळे आमचे श्रमदानाचे 35 दिवस काम झाले तेव्हा कुठे आम्ही 4000 हजार घनमीटर पर्यंत गेलो. उरलेले 3000 घनमीटर काम कसे करावयाचे यावर विचार करत होतो. भोसरे गावाचे काम पाहत असताना मनुष्यबळातील सिमेंट बंधाऱ्यामूळे काम वाढले व ते महाराष्ट्रात दूसरे गाव आले होते. हे राजूच्या लक्षात आल्यावर राजुने राम सराला व अझरला सांगितले जर आपण मनूष्यबळातील सिमेंट बंधारे केले तर आपले काम वाढेल परंतु त्यासाठी ज्यादा खर्च होता. वाळू, सिमेंट, खडी, प्लेटा हे बरेच काम होते. परंतु राजूला राम सरांनी सांगितले कीतीही पैसे गेले तरी चालतील परंतु 7000 घनमीटर चे टार्गेट पूर्ण करावयाचे त्यानुसार आप्पा बोडखे व संदीप तरटे यांच्या मदतीने प्रा.राम बोडखे यांनी सहा ते आठ दिवसात हे काम पूर्ण केले. त्यामूळेच 7000 घनमीटरचे काम पूर्ण होऊ शकले. यासाठी पाणी फांडेशन तालुका समन्वयक प्रविण काथोटे व कैलास पन्हाळकर सर यांचे खुप मोठे मार्गदर्शन आनंदवाडी गावासाठी लाभले. त्यामुळेच पाणी फांडेशनचे काम पूर्ण होऊ शकले.

यंत्रकामाने नाला खोलीकरण करण्यात आले. तसेच डोंगरावर डीप.सी.सी.टी. चे काम केले हे काम शेवटच्या टप्प्यात पूर्ण केले. डीप.सी.सी.टी. हे सर्व काम ट्यूब लेवलवर करण्यात आले या कामासाठी गावातील यूवक टीम रात्री तीन तीन वाजेपर्यंत चूना मारण्याचे काम करत होते. हे काम करतांना रात्री गणू मोटर सायकलवरुन पडला.

त्याच्या गुडघ्याला मोठ्या प्रमाणात मार लागला. तसेच भगवानसरांचा मूलगा काम करत असताना चालताना दगडाला ठेच लागली त्यामूळे हात फ्रॅक्चर झाला. गावातील मूले श्रमदान हे रात्रीचे करत असल्यामूळे रात्री झोपण्यासाठी डोंगरावर झोपत असत. जयदीपच्या शेतात झोपलो असताना ओमला दोनवेळा व अझरला एकवेळा विंचू चावला. तसेच कीतीतरी जणांना रात्री साप आडवे गेले. परंतु या व्यतीरीक्त रात्रीचे श्रमदान करताना मोठ्या स्वरुपाची इजा कोणालाच झाली नाही.

कापरे पाटलाच्या शेतात कंटूरचे काम टाकण्याचे काम चालू होते. त्यादिवशी सांगितले की तुमच्या गावात सिनेअभिनेते गिरीष कुलकर्णी सरांची टिम भेटण्यासाठी येणार आहे. त्यानूसार आम्ही रात्रीचे श्रमदान सुरु केले. रात्री 10.30 वा गिरीष कुलकर्णी व त्यांची टीम आनंदवाडी गावात आली. गावाला येण्यासाठी नीट रस्ता नव्हता त्यामूळे ते खूप चीडले. तसेच डोंगरावर श्रमदानाचे काम चालेले होते. त्यांना या गोष्टीचा त्रास वाटत असावा असे आनंदवाडी गावातील लोकांना वाटत होते. गिरीष कुलकर्णी सर डॉ.राम बोडखे सरांच्या गाडीवर बसले. त्यांना गाडी चालवत असताना गावाचा सर्व इतिहास सांगितला. गावात रस्ता नाही. गावाची वाईट अवस्था झाली होती. त्यांना विशेष ह्या गोष्टीचे वाटले की, गावातून कॅनलने पाणी जात असताना लोक काम करत होते. कारण त्यांनी यापूर्वीचे दूष्काळ अनूभवले होते त्यामूळेच ते गावात श्रमदानाचे काम करत होते. असे कुलकर्णी सरांना सांगितले. जेव्हा त्यांना श्रमदानाच्या ठिकाणी आणले तेथे स्टेडिअमचे रूप आल्यासारखे दिसले तेथे लाईट लावून लोक श्रमदानाचे काम करत आहे हे पाहून गिरीष कुलकर्णी बरोबर इतर 8 ते 10 लोक होते ते सर्व खूष झाले. आपण या ठिकाणी येण्यासाठी नको म्हणत होते परंतु या आनंदवाडी गावातील लोक रात्रीचा दिवस करुन श्रमदानाचे काम करत आहेत. हे पाहून सर्व टीम खूष झाली. गिरीष कुलकर्णी सरांनी श्रमदान करणाऱ्या लोकांबरोबर श्रमदान करताना फाटो काढले. सर्व लोकांना नंतर प्रा.राम बोडखे सरांनी एकत्र केले व गिरीष सरांनी सर्वांना मार्गदर्शन केले हे मार्गदर्शन आनंदवाडी गावाच्या श्रमदानासाठी एक उर्जेचा स्त्रोत होता. त्यांनी गावाची स्तुती केली. गाव हे नावासारखेच आनंदी आहे व नक्कीच राज्यपातळीवर जाऊ शकते असे सांगितले

यानंतर गिरीष कुलकर्णी सरांनी लोकसत्ता पेपरला आनंदवाडी गावावर एक लेख लिहीला त्यामूळे गावाचे नाव सर्व महाराष्ट्रभर झाले. आम्ही ग्रामस्थांनी हे 45 दिवस प्रसिध्दी माध्यमापासून दूर राहण्याचे ठरविले होते. कारण प्रसिध्दीमूळे चांगल्या कामाला विरोध होतो.

एके दिवशी नीला साहेब, माळी साहेब, सरगर साहेब आनंदवाडी गावात श्रमदानाला आले. त्या दिवशी जि.प.शिक्षक व काही अंगणवाडी ताई श्रमदानाला सकाळी आल्या होत्या. त्यादिवशी आनंदवाडी गावातील ग्रामस्थही सकाळी मोठ्या प्रमाणात श्रमदानाला आले. श्रमदात्यांना मार्गदर्शन करताना निला साहेबांनी हे गाव जे चळवळीत 10 ते 15 वर्षापासून टिकून आहे ह्या गोष्टीचे विशेष वाटले. कारण इतकी वर्षे गाव श्रमदानाला टिकून राहत नाहीत.

स्पर्धेचा शेवट हा कुरणातील डॉ.उत्तम शिंदे यांच्या शेतात झाला. त्यादिवशी गावातील 250 च्या आसपास लोक श्रमदानाला जमले. रात्री 12.00 वाजेपर्यंत श्रमदान केले त्यानंतर सर्व ग्रामस्थ एकत्र बसलोत व 45 दिवसाच्या अनूभवावर सर्वांनी सविस्तर आपल्या आपल्या प्रतिक्रिया दिल्या. या प्रतिक्रिया खूप बोलक्या होत्या. कारण प्रत्यक्ष जे अनूभवले ते सांगितले जात होते. रात्री 2 वाजेपर्यंत आपआपले मत मांडले जात होते. शेवटी रात्री 2.00 वा. पसायदान घेऊन स्पर्धेचा समारोप केला. अशा प्रकारे गावात पाणी फाऊंडेशनची स्पर्धा समाप्त झाली. गावाने 100 पैकी 87 गुण घेतले. त्यामूळे गावाची निवड झाली.

स्पर्धा समाप्त झाल्यावर पाहणीसाठी टिम येणार होती त्यानुसार पहीली टीम दिलीप देवताळे सरांची आली. तीचे स्वागतही टाळ मृदुंगाच्या गजरात अमोलच्या घरापासून केले. ते खूप खुष झाले. त्यादिवशी गावात रांगोळ्या काढल्या तसेच गाव एकदम स्वच्छ करण्यात आले. मार्गदर्शन केल्यावर ही टीम केलेली कामे पाहण्यासाठी गेली त्यांनी पाहणी केली व गावाच्या कामावर समाधानी होते. त्यानंतर दूसरी टीम आली. या टिमवेळी सत्कार करावयाचा नव्हता. स्वागत करावयाचे नव्हते. त्यामूळे आम्ही गावातील महिलांसाठी लाल किंवा गुलाबी रंगाची साडी ठेवली तर मूलांना निळी पँट व

पांढरा शर्ट ठेवला. त्यामूळे गावातील एकी त्यांना दिसत होती. तसेच गावात रंग देण्यात आला होता. हा रंग पांडुरंग बोडखे (इंजि.) यांनी दिला. तसेच त्यावर चित्र काढण्याचे काम करण्यात आले त्यामूळे गाव अधिक सुशोभित झाले दूसऱ्या टिमचे प्रमुख प्रविण सर हे होते. त्यांनाही गावातील एकी, काम पाहून खुप चांगले वाटल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरुन वाटत होते. अशा प्रकारे गावात दूसरी टिम येऊन गेली. आता गावात तिसरी टिम येण्याचे या दूसऱ्या टिमवर अवलंबूर होते. त्यानुसार गावात तिसरीही टिम येणार हे समजले.

आनंदवाडी गावाची महाराष्ट्रात जी 16 गावे निवडली होती त्या गावात निवड झाली गावाला कोणते ना कोणते तरी बक्षीस मिळणार हे नक्की झाले होते. गाव राज्य पातळीवर जाण्यासाठी कामाची गुणवत्ता, कामाच्या ठिकाणी लावलेले बोर्ड, काम केले त्यावर बनवलेले बूकलेट हे बूकलेट टिमला फार आवडले होते कारण त्यांना कामच आवडले होते या सर्व गोष्टीमूळे आनंदवाडी गावात तिसरी टिम येणार होती ह्या टिममध्ये मा.पोपट पवार, मा.मोहिते सर व मा.डावरे सर येणार होते.

त्यानुसार आम्ही तिसऱ्या टिमच्या स्वागतासाठी तयार झालोत. गावातील लोकांचा उत्साह वाढवण्यासाठी खंडोबा मंदीर येथे ग्रामसभा घेतली व आनंदवाडी गावात देखील ग्रामसभा घेतली. तसेच हे सर्व मिळून आनंदवाडीच्या मंदीरात मिटींग लावली. या मिटींग मध्ये मा.पोपट पवार गावाला 12 वर्षापूर्वी येऊन गेले होते. ती सी.डी.दाखवली त्यामूळे लोक खूष झाले. तसेच गावातील रात्रीच्या श्रमदानाची पी.पी.टी. बनविली होती. ती टिम येण्याआधीच्या दिवशी लोकांना दाखवली. त्यामूळे लोक खूप खूष झाले. आष्टी तालूक्यातील दोन गावे राज्य पातळीवर गेले होते. दूसरे गाव करंजी होते.

आष्टी तालूक्यात टिम मुक्कामालाच आली. सकाळी टीम करंजीची पाहणी करण्यासाठी गेली. तेथील पाहणी करुन आल्यानंतर आनंदवाडी गावात दूपारी 2.00वा. टिम आली टिमचे स्वागत टाळ, मृदुंग, गजरात करण्यात आले. त्यांना ते खूप आवडले त्यानंतर मंदीरात बसलोत तेथे आम्ही या टिम समोर महीलांना बसविले व महीलांच्या हस्ते टिमच्या सदस्यांना पूस्तक भेट दिले. टिममधील तीनही सदस्यांनी गावाला

मार्गदर्शन केले. पोपट पवारांनी जवळ जवळ एक तास मार्गदर्शन केले लोकांना खूप हसवत ठेवले. लोक हसत खेळत प्रश्नांना उत्तर देत होते. सर्व वातावरण आनंदमय झाले. टिमचे मार्गदर्शन झाल्यावर तीन विभागात टिम विभागून त्यांनी सर्व गावाची पाहणी केली. जे 45 दिवसात करण्यात आली होती ती सर्व काम तिघांनी मिळून पाहण्यात आली. कामे पाहून झाल्यावर टिमने सरपंचांच्या घरी फलाहार चहापाणी घेतले. तेथेही पवार साहेब मूलांना गाव विकासावरच मार्गदर्शन करत होते. गावामध्ये टिम जवळ जवळ पाच तास थांबली. त्यानंतर टीम नगरला निघून गेली. आता आम्ही फक्त राज्यस्तरीय पातळीवर गेल्यामूळे निकाल किती तारखेला लागणार हीच वाट पाहत होतो. त्यानुसार निकाल 12 ऑगस्ट 2018 रोजी पूण्याच्या बालेवाडी स्टेडीअम येथे स्पर्धेचा निकाल लागणार होता. परंतु आमचा आत्मविश्वास होता. आनंदवाडी हे गाव महाराष्ट्रातील वॉटर कप जिंकणारच.

**जय पाणी फाऊंडेशन**

दि.12/08/2008 रोजी पूण्यातील बालेवाडी येथे बक्षिस समारंभ होता. यासाठी आम्हाला पाणी फाऊंडेशनने 14 तिकीटे / पास दिली. कोणाला घेऊन जावे यावर तीन चार दिवस विचार विनिमय केला. यानंतर 14 लोक आम्ही सकाळी 5 वाजता पूण्याला जाण्यासाठी निघालोत सकाळी 9 वाजता बालेवाडी येथे पोहोचलो तेथे नाष्टा केला व बक्षिस हॉलमध्ये 10.30 वाजता गेलोत. हॉलमध्ये जाताना तीनवेळा पोलिसांनी आमची सर्वांची चेकींग केली. सकाळच्या सत्रात तालूक्यातील गावांना बक्षिस देणार होते. त्यानुसार बक्षिस वितरणाला सुरुवात झाली.

आष्टी तालूक्याचे नाव आल्यानंतर पहीले बक्षिस करंजीला गेले. दूसरे बक्षिस आनंदवाडीला गेले तर तिसरे बक्षिस कासेवाडीला गेले. आनंदवाडीचे नाव घेतल्यावर सर्वच खूप नाराज झाले. बक्षिस समारंभातून निघून जाण्याचा विचार आमच्या मनामध्ये येत होता. परंतु स्पर्धेत हार जीत चालूच असते. महाराष्ट्रामध्ये वॉटरकप कोण जिंकणार हे पाहण्यासाठी थांबण्याचा आम्ही सर्वांनी विचार केला पाहील्या सत्राच्या समारोपवेळी डॉ.पोळांनी जे 16 गावे महाराष्ट्रात आली आहेत त्यातील कोणीही जायचे नाही असे सांगितले तेव्हा वाटले की एखाद्यावेळेस महाराष्ट्रात पून्हा आनंदवाडी गावचा नंबर येईल.

दूपारचे जेवन करण्यासाठी बाहेर आल्यावर श्री देवताळे सर बाहेर भेटले त्यांनी सांगितले तुमचे गाव नक्कीच महाराष्ट्रात येईल तुम्ही काळजी करु नका. दूपारचे जेवण झाल्यावर पून्हा सर्वांसाठी नवीन 10 पास दिले. आम्ही सर्वजण पूढे बसलोत कार्यक्रम सुरु झाल्यानंतर आम्हा 10 जणांना व्यासपीठाच्या मागे बोलावून घेतले. नियोजन कमीटीने आम्हाला सांगितले तुम्हाला बक्षिस मिळणार आहे. परंतु तुम्ही बक्षिसावेळी मुख्यमंत्र्यांच्या समोर मराठा आंदोलनासाठी आंदोलन करणार आहेत असा गुप्त रिपोर्ट मुख्यमंत्र्यांच्या टिमला कोणीतरी दिला होता. डॉ.पोळ व सत्यजित भटगळ सरांनी सांगितले तुम्ही जर असे करणार असाल तर तुमचे बक्षिस रद्द करुन दूसऱ्याला देण्यात येईल.

मुख्यमंत्र्यांचे संरक्षण करणारी टिम व पाणी फाऊंडेशनची टिमला सांगितले की, मी सरपंच स्वतः (राम बोडखे) अण्णा हजारेंवर संशोधन केले असुन गांधीवादी विचाराचे अनुकरण करणारा आहे. असे काही होणार नाही असे अश्वासन दिले. तसेच पोलिसांच्या टिमने आमची अर्धातास सखोल चौकशी केली.

महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमांकाचे वॉटरकपचे बक्षिस आनंदवाडी गावाला मिळाले सर्वांनाच खूप आनंद झाला आमचा आनंद गगनात मावला नाही. डोळ्यात आनंदअश्रू वाहू लागले. आनंदवाडी गावाने रात्रीचा दिवस केलेल्या कामाचे चिज झाले. सर्व मराठी चॅनलवर आनंदवाडीचे नाव झळकू लागले. याच दिवशी गावात काल्याचे किर्तन होते. गावात सर्वांना खूप आनंद झाला. गावाला 20 लक्ष रुपयाचे बक्षिस मिळाले. सर्व स्तरावरुन अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला.

13 तारखेला गावात संध्याकाळी कार्यक्रम घेतला. लोकांना पेढे वाटले सर्वांनी मनोगत मांडले. सर्व गाव मारुती मंदीरात गोळा झाला होता. दूसऱ्या दिवशी कलेक्टर साहेबांनी भेट घेण्यासाठी बोलाविले. आम्हाला 45 मिनिटे वेळ दिला. गावाची सर्व माहिती विचारली. गावाला अनेक विकास योजना देतोत असे अश्वासन दिले. आष्टीत वेगवेगळ्या ठिकाणी आनंदवाडी गावाचा सत्कार होत होता. आमदार सुरेश (अण्णा) धस यांनी 15 ऑगस्ट रोजी त्यांच्या शाळेवर आनंदवाडीचा सत्कार केला.

अशा प्रकारे आनंदवाडी गावांनी पाणी फाऊंडेशन स्पर्धेत भाग घेऊन मराठवाड्यातील एकमेव गाव फक्त आनंदवाडी नेच विजय मिळविला होता. त्यामूळे गावाचे सर्वत्र कौतुक केले जात होते. हे गावातील यूवक व महिलांनी केलेल्या श्रमदानाचे फळ बक्षिस रुपाने मिळाले गावाचे नाव सर्व महाराष्ट्रभर झाले ह्या स्पर्धेत महत्वाची भूमिका बजावली ती सरपंच डॉ.राम बोडखे, प्रा.हेमाली बोडखे, राजेश बोडखे, शेख अझर तसेच गावामधील युवक व महिलांनी इ.सर्वांनी मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली होती.

पाणी फांडेशन मुळे जे गावात पाणलोटाचे काम झाले त्यामुळे गावातील पाणी प्रश्न सुटला. गाव जर एकत्र आले तर गावाचा श्रमदान करून विकास होतो हे राळेगणसिध्दी व

हिवरे बाजार या गावांनी जसे दाखविले तसेच आनंदवाडी गावाने श्रमदान करून गावाचा पाण्याचा प्रश्न सोडविला यामुळे सर्व ग्रामस्थ खूष झाले शेजारील गावांना पाणी कमी पडले, परंतु आनंदवाडी गावाला पाण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही हे केवळ शक्य झाले ते श्रमदान व पाणी फांऊडेशनच्या मार्गदर्शनामुळे. आनंदवाडी हे गाव आदर्श बनू शकले श्री. अण्णा हजारे व श्री. पोपट पवारांच्या प्रेरणेमुळे.

# प्रकरण सातवे
# निष्कर्ष

# प्रकरण सातवे
# निष्कर्ष

सामाजिक संशोधनामध्ये अभ्यासाचे मुद्दे स्पष्ट करताना त्या आधारे संशोधकाला काही ठळक निष्कर्ष मांडावे लागतात. आदर्श गाव आनंदवाडीचा ग्रामविकासातील ऐतिहासिक लढा एक अभ्यास याचे निष्कर्ष काढलेले आहेत ते खालील प्रमाणे सांगता येतील.

1) आनंदवाडी गावाचे हे नाव ठेवले कारण त्या गावातील सर्व लोक एकत्र येऊन चांगले काम करत होते.

2) आनंदवाडी गावाने गाव हगणदारी मुक्त करण्याचा संकल्प केला आणि ते सन 2004-2005 ला मराठवाड्यातील पहिले हगणदारी मुक्त गाव बनले.

3) आनंदवाडी गावाने गाव व्यसनमुक्त करण्याचा संकल्प केला आणि गावातील दुकानात एकही व्यसनाचे पदार्थ ठेवले नाही.

4) आनंदवाडी गावाने पाणी पुरवठा योजना श्रमदानातुन केल्यामुळे सरकारने जल स्वराज योजना दिली हे श्रमदानाचे महत्व आहे.

5) आनंदवाडी गावाने राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर घेऊन हगणदारी मुक्त गावाचा प्रसार व प्रचार केला.

6) आनंदवाडी गावामुळे सराटेवडगाव ग्रामपंचायला चार पुरस्कार मिळाले.

7) आनंदवाडी गावात वाद विवादामुळे गावाचा विकास थांबला गेला याचीही प्रचिती गावाला आली.

8) पाणी फौंडेशन या संस्थेने सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा घेतली. या स्पर्धेत आनंदवाडी गावाने राज्यात तृतीय क्रमांक मिळवून 25 लक्ष रुपयाचा पुरस्कार मिळविला.

9) आनंदवाडी गावात पाणलोटाचे काम झाल्यामुळे पावसाळ्यात गावाचे पाणी वाहून न गेल्यामुळे गावाचा पाण्याचा प्रश्न संपला.

10) आनंदवाडी गावाचा श्रमदानामुळे विकास झाला. स्वातंत्र्यानंतर सर्वात मोठे काम पाणी फाऊंडेशनमुळे झाले.

11) आदर्श गाव होण्यासाठी गावातीलच लोकांनी पुढाकार घ्यावा लागतो, तेव्हा गाव आदर्श होते.

अशा प्रकारे आदर्श गाव आनंदवाडी चा विकास झाला आहे. याची माहिती आपल्याला या लघुशोध प्रकल्पातून घेता येते गाव आदर्श करण्यासाठी या लघुशोध प्रकल्पाचा नक्कीच उपयोग होईल कारण की, महाराष्ट्र व भारत देश हा खेड्यांचा मिळून बनलेला आहे. खेडी आदर्श झाल्याशिवाय गावाचा विकासच होणार नाही. त्यामुळे गाव आदर्श करण्यासाठी या प्रकल्पाचा नक्कीच उपयोग समाजास होईल. कारण आदर्श गाव हिवरे बाजार व राळेगणसिध्दी पाहून आज महाराष्ट्रात शेकडो गावे आदर्श होऊ लागली आहेत हेच स्वप्न महात्मा गांधी, संत गाडगे बाबा व तुकडे महाराजांनी पाहिले आहे.

# संदर्भसूची :-


**वर्तमानपत्रातील बातम्या**

1) दै. झुंजार नेता- दि. 31 ऑगस्ट 2005.

2) दै. झुंजार नेता- दि. 22 डिसेंबर 2005.

3) दै. लोकमत- दि. 14 व 15 एप्रिल 2008.

4) दै. झुंजार नेता- दि. 19 डिसेंबर 2006.

5) चंपावती पत्र - दि. 7 ते 2008.

6) दै. पार्श्वभूमी दि. 16 नोव्हेंबर 2005.

7) दै. दिव्य मराठी दि. 3 डिसेंबर 2012.

8) दै. सकाळ दि. 5 डिसेंबर 2012

9) सायं. दैनिक सरकार दि. 3 डिसेंबर 2012.

10) दै. संविधान सम्राट दि. 2 मार्च 2014.

11) लोकाशा दि. 19 नोव्हेंबर 2010.

12) चंपावती पत्र दि. 29 डिसेंबर 2010.

13) सकाळ दि. 26 जानेवारी 2011.

14) बीड संकेत दि. 29 डिसेंबर 2010.

15) दै. दिव्य मराठी दि. 13 ऑगस्ट 2018.

16) दै. सकाळ दि. 13 ऑगस्ट 2018.

17) दै. झुंजार नेता दि. 13 ऑगस्ट 2018.

18) फोटो व शुटींग

19) सरपंच, उपसरपंच व वयस्कर व्यक्तींशी मुलाखत.

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित शिबीर अहवाल

# २०१८-२०१९

O/C

Anand Charitable Sanstha Ashti's

# ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA

(Arts, Commerce & Science)

TAL. ASHTI, DIST. BEED (MS) - 414 202

☎ 02441- 239621

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



NAAC GRADE - "A" | ISO 9001:2008 Certification | Principal Dr. H.G. Vidhate

Ref. No.ADMK / 2018-2019/347 Date: 18/ 3 /2019

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक साहेब,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय :— नियमित शिबीर सन २०१८—१९ चा अहवाल स्विकारणे बाबत.....**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०१८—१९ या शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित केलेल्या नियमित शिबीराचा अहवाल आपणास सादर करीत आहोत.

तरी मे. साहेबांनी विशेष शिबीराचा अहवाल स्विकारून सहकार्य करावे.

हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

**सोबत :—**
१. अहवाल
२. फोटो
३. पेपर कात्रण
४. स्वयंसेवक उपस्थिती पत्रक

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी जि. बीड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## वृक्षारोपन अहवाल

वृक्षारोपन व वनमहोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी वृक्षारोपन व वृक्षसंवर्धनाचे महत्व सांगताना असे म्हटले की, आज दुष्काळ व अवर्षणग्रस्त स्थिती निर्माण होण्याचे कारण म्हणजे मोठया प्रमाणात होत असलेली वृक्षतोड होय. त्यामुळे झाडांची संख्या कमी होऊन निसर्गाचा असमतोल निर्माण झाला. त्यामुळे काही ठिकाणी प्रचंड पाऊस तर काही ठिकाणी आजिबात पाऊस नाही. पावसाची अनियमितता त्यामुळे माणसाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यावर एकच उपाय म्हणून वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन काळाची गरज बनली आहे.

शासनाच्या २.५० कोटी वृक्ष लागवडीचे उदिदष्ट साध्य करण्यासाठी वृक्ष लागवड पंधरवडा दि. ०१ जूलै ते १५ जूलैची रूपरेषा ठरविण्यात आली. त्यानुसार महाविद्यालयीन प्रांगणात ठिकठिकाणी ८० वृक्षांची लागवड करून त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना देण्यात आली.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तक गांव सराटेवडगांव (आनंदवाडी)येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवशीय वृक्षारोपन शिबीराचे आयोजन दि. ११.०७.२०१८ रोजी करण्यात आले. या एक दिवशीय शिबीरामध्ये निंब, पिंपळ, करंजी इत्यादी जवळपास ३०० वृक्षांची गावालगत असलेल्या पश्चिमेला मेहकरी कॅनल व सराटेवडगांव (आनंदवाडी) रोड लगत लागवड करण्यात आली. वृक्षारोपन पंधरवडयात एकूण ३८० वृक्षांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. एम. चव्हाण यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. श्रीमती. जी.एस. जगताप यांनी मानले. याप्रसंगी सराटेवडगांव (आनंदवाडी) गावचे सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, ग्रामविकास अधिकारी बलभिम परकाळे साहेब, गावातील तरूण मंडळ, ग्रामस्थ, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. एन. औटे, डॉ. जी. पी. बोडखे, प्रा. डॉ. बी. एस. खैरे, प्रा. ईश्वर नन्नवरे, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व एन.एस.एस. स्वयंसेवक मोठया प्रमाणात सहभागी होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी जि.बीड

## वॉटर कप स्पर्धा २०१९

## पाणी फाऊंडेशन कार्यशाळा दि. १७/०१/२०१९

### अहवाल

दि. १७/०१/२०१९ रोजी आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच पाणी फौंडेशन आष्टी तालुका '' पाणी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धा'' अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळेचे महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन सकाळी ठिक ९.३० वा संपन्न झाले. त्यानंतर या कार्यशाळेत व्याख्यान व प्रात्यक्षिक असे दोन भागामध्ये कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेसाठी अध्यक्ष म्हणून महाविलयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एम. वाघुले हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धेचे जिल्हा समन्वयक मा. बिभिषण भोईटे, मा. कैलास पन्हाळकर (आष्टी तालुका समन्वयक पाणी फाऊंडेशन ) कु.अपेक्षा सुपेकर (तांत्रिक प्रशिक्षक), मा. प्रशांत माने (ट्रेनर) मा. ईश्वर नलावडे, कु. उज्वला गावडे, कु. प्राची भूतकर, कु. स्नेहा अतुगडे, कु. पूजा जगताप, मा. अशोक इंगोले, मा. ह्षीकेश तांबीले, मा. रविंद्र पोमणे, मा. शहाजी शिंदे, मा, अनिकेत खेडकर सर्व पाणी फाऊंडेशनची टीम यांनी कार्यशाळा यशस्वीतेसाठी मोठी मेहनत घेतली. या प्रसंगी शिरापूरचे उपसरपंच मा. यवुराज देवकर, सराटेवडगावचे सरपंच्र मा. प्रा. डॉ. राम बोडखे व इतर गावचे नागरिक उपस्थित होते.

या कार्यशाळेत प्रथम मा. बिभिषण भोईटे बीड जिल्हा समन्वयक पाणी फाऊंडेशन यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी बोलताना सांगितले की आपण शासनाकडे बघत बसलो तर

आपल्या गावाचा विकास करणे खूप अवघड आहे. परंतु युवकांनी गावाचा प्रश्न हातामध्ये घेतल्यास काही दिवसात कायमचा प्रश्न सुटू शकतो हे मी खात्रीपूर्वक आपणास सांगतो. अध्यक्ष पदावुन बोलताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य म्हणाले की, युवाशक्ती एकवटली तर पाणी प्रश्न सुटू शकतो. म्हणून प्रत्येक गावात श्रमदानातून मोठे काम उभे राहणे हे किती गरजेचे आहे हे पाणी फाऊंडेशनच्या प्रात्यक्षिकातून आपल्या लक्षात येईल फक्त याची अंमलबजावणी करण्यासाठी आपण पुढे यावे.

यानंतर पाणी फाऊंडेशनच्या ट्रेनरने काही व्हिडोओ क्लिपच्या माध्यमातून विद्यार्थी — विद्यार्थीनी यांना विचार करण्यास भाग पाडून मंत्रमुग्ध केले. सर्व व्याख्याने झाली. त्यानंतर प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. पावसाचे पाणी डोंगर माथा ते पायथा कशा पध्दतीने पाणी जिरवण्याचे वैज्ञानिक तंत्र समजावून प्रत्यक्ष कृतीद्वारे विद्यार्थ्यांना पटवून दिले शिवाय माती नाला समपातळीचर, कंटूर बडींग, याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच सेंद्रीय खताचे महत्व, रासायनिक खतामुळे जमीन कशी नापिक होत आहे. याचे प्रात्यक्षिक तसेच मातीमध्ये पाणी जिरवण्यासाठी माती कशी असावी याचे सुंदर उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर केले. त्या बरोबर झाडाचे महत्व एका गाण्याच्या माध्यमातून व खेळाच्या माध्यमातून सर्वांना हसत खेळत पटवून दिले. शेवटी आजोबाचा काळ, वडीलांच्या काळात व आता मुलाच्या काळात पाण्यासाठी कशी स्पर्धा सुरू आहे याचे सुंदर प्रयोग सादरीकरणातून पाण्याचे महत्व सर्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सर्व कार्यक्रम ठिक ४.३० वा संपला तेव्हा विद्यार्थी आनंदी दिसत होते. खरे ज्ञान मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेह—यावर दिसून आला. शेवटी विद्यार्थी प्रतिक्रिया घेण्यात आल्या त्यावुन हे स्पष्ट दिसत होते. कार्यक्रमात विद्यार्थी — विद्यार्थीनी महाविद्यालयातील प्राध्यापक सर्व शिक्षकेत्तर कर्मचरी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले शेवटी आभार प्रा. शैलजा कुचेकर यांनी मानले.

Programme Officer
N S S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

राष्ट्रीय सेवा योजना विभागीय शिबिर 2018-19




(वन महोत्सव सप्ताह निमित्त दत्तक गाव मराठे वडगाव येथे वृक्षारोपण करतांना स्वयंसेवक व कर्मचारी)



(वनमहोत्सवानिमित्त वृक्षारोपण करतांना स्वयंसेवक)

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता-आष्टी
राष्ट्रीय सेवा योजना 2018-19



वॉटर कप स्पर्धा, पाणी फाऊंडेशन कार्यशाळेत NSS स्वयंसेवकांना "पाणी अडवा पाणी जिरवा" या बाबत मार्गदर्शन करतांना. मा. प्रशांत माळे.



पाणी फाऊंडेशन कार्यशाळेत सहभागी स्वयंसेवक.

बीड संकेत

e-mail- bhrbsanket@gmail.com

संपादक-नरेन्द्र कांकरिया

सोमवार दि.१६ जुलै २०१८ बीड फोन/फॅक्स क्र. (०२४४२) २३०११० R.N.I. No.70487/94 पो.र.नं. एल/१३/एसटीएस/बीड २०

# आनंदवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण



कडा दि.१५ (बातमीदार): आष्टी तालुक्यातील आनंदवाडी (सराटेवडगांव) येथे कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. सत्यमेव जयतेच्या वॉटरकप स्पर्धेत महाराष्ट्रातील पंधरा गावाची निवड झाली यामध्ये आनंदवाडीचा समावेश आहे. याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवडीचें उद्दीष्ट समोर ठेवून आनंदवाडी येथे मेहेकरी कॅनालच्या कडेला वड, पिंपळ, करंजी, चिंच, निंब अशा वेगवेगळ्या ३०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आनंदवाडी हे गांव दत्तक घेण्यात आले आहे. याप्रसंगी प्राचार्य डॉ.हरीदास विधाते, सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपप्राचार्य डॉ.भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.पंडीत औटे, प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.गायत्री जगताप, प्रा.डॉ.बापु खैरे, प्रा.डॉ.जी.पी. बोडखे, प्रा.डॉ.एम.आर. पटेल, प्रा.डॉ.सज्जन गायकवाड, प्रा.डॉ.जी.एम. पठारे, प्रा.डॉ.मंगल टेकाडे, प्रा.डॉ.एस.ए. खेडकर यांच्यासह ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

पाणी फौंडेशन कार्यशाळा 17/01/2019


# झुंजार नेता

राष्ट्र ■ शुक्रवार दि.१८ जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201


## पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून युवकांनी विकास साधावा-भोईटे



कडा, दि.१७ (प्रतिनिधी):- युवकांनी ग्रामीण भागातील पाणी समस्यांवर कायमची मात करण्यासाठी पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून श्रमदानातून गावाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन सत्यमेव जयते पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक बिभीषण भोईटे यांनी केले. याबाबत अधिक माहिती अशी की, सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन आयोजित युवा शक्तीचे युद्ध दुष्काळ विरुद्ध या बाबत कार्यशाळा कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक बीभिषण भोईटे, ॲड. रविंद्र पोमने, शहाजी शिंदे, तालुका समन्वयक कैलास पन्हाळकर, अनिकेत खेडकर, उपसरपंच देवकर, समाधान येलपल्ले यांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पुजा करून अभिवादन करण्यात

आले. पुढे बोलताना भोईटे यांनी सांगितले
दिवसेंदिवस पाणी समस्या बिकट होत चालली अ
पाणी समस्या कायमची सोडविण्यासाठी गावागा
पाणी बचतीबाबत जनजागृती झाली पाहि
गावपातळीवर युवकांनी श्रमदानातून पावसाचे पड
पाणी जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत. या
उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले व इतरांची भाषणे झा
कार्यशाळेचे निमित्ताने पाणी फाऊंडेशनच्याव
विद्यार्थ्यांना पाणी अडवा पाणी जिरवा यावर आध
वेगवेगळे प्रयोग दाखविण्यात आले. यावेळी प
फाऊंडेशनचे तांत्रिक प्रशिक्षक अपेक्षा सुपेकर,प्र
माने, ईश्वर नलावडे, नाथसाहेब सरक, उज्ज
गावडे,प्राची भुतकर,स्नेहा अतुगडे,,पुजा जग
अशोक इगोले, ऋषीकेश तांबिले यांनी प्रात्यक्षिका
मार्गदर्शन केले व विशेष परिश्रम घेतले. कार्यक्र
प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधि
प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. सुत्रसंचलन
डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आ
प्रा. डा. शाम सागळे यांनी मानले.

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,

## कडा ता. आष्टी जि. बीड

## "जलव्यवस्थापन आणि समृध्द ग्राम कार्यशाळा"

## <u>अहवाल</u>




04/10/2021

## जलव्यवस्थापन आणि समृध्द ग्राम कार्यशाळा

पाणी पाणी पाणी कुठे गेले पाणी पाणी हे उद्याचे जीवन आहे. पृथ्वीवर पडणाऱ्या पावसाचे पाणी ओढ्याच्या नदीच्या रूपाने समुद्राला मिळते. काही पाण्याची वाफ होते. पृथ्वीवरचे एकूण पाणी आहे त्यापैकी ९८ टक्के पाणी हे क्षारयुक्त आहे. राहिलेले दोन टक्के पाणी फक्त गोडे पाणी किंवा वापरण्यायोग्य आहे. याचा विचार करता पाण्याचे व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्याचे संवर्धन करणे व संवर्धनामध्ये येणारे अडथळे याचा विचार करणे गरजेचे आहे. नव्या तंत्रज्ञानानुसार सागरी पाणी किंवा क्षारयुक्त पाणी शुद्ध करून वापरण्यास मध्यपूर्व राष्ट्रांमध्ये सुरुवात झाली आहे. नव्या स्रोताचा शोध घेण्यासाठी व भूभागावर उपलब्ध असणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी जल व्यवस्थापनाची जागृती करण्यासाठी आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा, ता. आष्टी, जि. बीड, भूगोल विभाग व महाराष्ट्र राज्य पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ऑक्टोंबर २०२१ रोजी महाविद्यालयामध्ये परिसरातील शेतकऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विधाते एच.जी. व प्रमुख मार्गदर्शक म्हणून पाणी फाउंडेशन महाराष्ट्र टेक्निकल ट्रेनर माननीय शरद बनगडे, पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक कैलास पन्हाळकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागाचे प्रा. डॉ. दत्ता नरसाळे यांनी केले. याप्रसंगी पाणी हे मानवाच्या जीवनामध्ये किती महत्त्वाचे आहे. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. शरद बनगडे सर यांनी पाणी व्यवस्थापन पाणी व्यवस्थापन संदर्भात पहिल्या सत्रामध्ये शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये कैलास पन्हाळकर पाणी फाउंडेशन आष्टी तालुका समन्वयक यांनी पाण्याचे व्यवस्थापन कशा पद्धतीने करता येईल, वॉटर शेड मॅनेजमेंट कसे उभारता येईल, समृद्ध ग्राम पाण्याशिवाय होऊ शकत नाही, जे गाव पाण्याबद्दल श्रीमंत आहे. त्या गावचा विकास कशा प्रकारे होतो. याचे हिवरे बाजार, सराटेवडगाव अशा गावांचा आदर्श घेऊन शेतकऱ्यांना जल व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी

परिसरातील शंभर शेतकऱ्यांनी उपस्थिती लावली तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला व कार्यक्रमाचे आभार डॉ. राजपांगे एम.जी. यांनी मानले.



प्रा.डॉ. नरसाळे डी.व्ही.
(भूगोल विभाग)

प्राचार्य
PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

ता. आष्टी, जि. बीड (४१४ २०२)

फोन (०२४४१) २३१६२१, २३११२१, फॅक्स ०२४४१-२३१६२१

प्राचार्य : डॉ. एच. जी. विधाते

E-mail : admkada@gmail.com Website : www.admkada.com ISO 9001:2008 Certification

जा.क्र. : आधोंमक / 2021/2022/390

दि. 01/10/2021

प्रति,
मा.शरद बनगडे
मास्टर टेक्नीकल ट्रेनर,
पाणी फाउंडेशन

विषय :— शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की, दिनांक ४.१०.२०२१ रोजी आमच्या महाविद्यालयाच्या भूगोल विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी व पाण्यासाठी काम करणा—या कार्यकर्त्यासाठी एक दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला असून आपण त्यात मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून सहकार्य करावे.

ही नम्र विनंती.

Recived
2/10/21

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय

(कला, वाणिज्य व विज्ञान)

कडा ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

NAAC 'A' Grade (3.11- CGPA) | ISO 9001:2015 Certification |

दि. 01 /10/2021

जा.क्र. : आधोमक / 2021-2022/391

प्रति,
मा.कैलास पन्हाळकर,
तालुका समन्वयक पाणी फाउंडेशन
आष्टी
जि.बीड

विषय :– शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की, दिनांक ४.१०.२०२१ रोजी आमच्या महाविद्यालयाच्या भूगोल विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी व पाण्यासाठी काम करणा–या कार्यकर्त्यासाठी एक दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला असून आपण त्यात मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून सहकार्य करावे.

ही नम्र विनंती.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

Recived
2/10/21

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय
कडा (भूगोल विभाग)

PAGE NO.

DATE

आज दिनांक 04/10/2021 रोजी आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा (भूगोल विभाग) नयाणी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जलव्यवस्थापन आणि समृद्ध ग्राम कार्यशाळा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्या प्रसंगी उपस्थित प्रशिक्षणार्थी व शेतकरी उपस्थिती खालील प्रमाणे.

1) कार्यक्रमाचे अध्यक्ष :-
मा. प्राचार्य डॉ. विधाते एच. जी.

2) प्रमुख पाहुणे
1) मा. शरद बनगडे — [signature]

2) मा. कैलास पन्हाळकर — Keul

3) प्रा. डॉ. नरसाळे डि. व्ही. — [signature]
4) प्रा. डॉ. राजपांगे एम. जी. — [signature]
5) प्रा. डॉ. टेकाडे एस. एस.

| | | |
|---|---|---|
| 6) | मधुकर लक्ष्मण शिंदे | मधुकर शिंदे |
| 07) | बाळू चंद्रकांत काळे | Balu.Kale |
| 8) | रामदास हरिभाऊ हजारे | Ramadas |
| 9) | महादेव जगन्नाथ जाधव | महादेव जाधव |
| 10) | कैलास हरिभाऊ वाळेवाड | Kailas Valeka |
| 11) | रावसाहेब जायकर सुधाम जायकर | Ravsaheb |
| 12) | दादासाहेब वेंकट कराडे | दादासाहेब कराडे |
| 13) | भाऊ नानासाहेब काळेखे | काळेखे भाऊ |
| 14) | महादेव लक्ष्मण कांबळे | कांबळे महादेव |
| 15) | छगण तुकाराम चव्हाण | छगण |
| 16) | संदिप नवनाथ कराडके | संदिप कराडके |
| 17) | बबन बाबासाहेब करडुळे | Baban |
| 18 | दिनकर हिरामन खडगळे | Hiraman |
| 19) | संतोष विठ्ठल महाजन | [signature] |

| | |
|---|---|
| 22. विष्णू भाऊसाहेब नाळे | Nale |
| 23. विकास शिवदेश्वर पगारे | Wokas |
| 24. शांतीलाल बाबासाहेब पाखरे | S.B. Pakhare |
| 25. संजय तुकाराम कोळेकर | S. tuk[illegible] |
| 26. सोहेल रज्जाक पठाण | Rjak |
| 27. महेंद्र काकासाहेब रथावणे | MKR |
| 28. पोपट आदिनाथ नरूटे | Popt |
| 29. राजेंद्र हस्तीमल रसाळ | RHR |
| 30) Akash Bipeen Lavate | Akash |
| 31) Anil Dilip ShelAR | ADS |
| 32 सुभाष शांताराम शिंदे | Subas |
| 33. सुंदरराव भिमासेन खंडागळे | खंडागळे |
| 34. Mahesh Buvasaheb Kawade | Mahesh |
| 35. Mahadev Bhagwan Aghav | M. B. Aghav |
| 36 शिवाजी हौसराव शिरसाठ | S.h.Si |
| 37. किशोर बाबासाहेब सूर्यवंशी | किशोर |
| 38 सतीश बारकू सारवर | सतीश बारकू[illegible] |
